मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६४ ■ रविवार, ०७ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# सलग चार दशके जनसेवेचा महायज्ञ अखंडपणे सुरू ठेवणारे जनसामान्यांचे साहेब बाळासाहेब !



भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी कोकण म्हाडा अध्यक्ष तथा रायगड जिल्ह्यातील लोकप्रिय नेते व विद्यमान विधान परिषद सदस्य आमदार विक्रांत दादा पाटील यांचे पिताश्री मा.बाळासाहेब पाटील यांचा 7 जून रोजी वाढदिवस साजरा होत आहे. गेली चार दशके भाजप संघटन, सामाजिक कार्य आणि सहकार क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. घरातूनच जनसेवेचे बाळकडू मिळालेले स्वातंत्र्यसैनिक स्व. ज्ञानदेव ब. पाटील यांचे सुपुत्र असलेल्या बाळासाहेब पाटील यांनी राजकारणात सक्रिय होत भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर उपाध्यक्ष, शहराध्यक्ष, रायगड जिल्हाध्यक्ष,महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य तसेच कोकण म्हाडा अध्यक्ष ( राज्यमंत्री दर्जा ) अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या असून पक्षवाढीसाठी त्यांनी सातत्याने परिश्रम घेत मुंबई,नवी मुंबई,रायगड,उल्हासनगर,कल्याण यांसह अनेक निवडणुकांमध्ये संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडत संपूर्ण रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाचा भगवा झेंडा फडकविण्यात मोलाचे योगदान दिले आहे . राजकारणासोबतच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून भरीव कार्य केले असून सहकार क्षेत्रात पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे सात वर्षे चेअरमन म्हणूनही त्यांनी यशस्वी नेतृत्व केलेले आहे. जनसेवा, संघटन कौशल्य आणि कार्यकर्त्यांशी असलेली आत्मीयता,आपुलकी यामुळे मा.बाळासाहेब पाटील यांनी रायगड जिल्ह्याच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा जोरावर एक वेगळी छाप निर्माण केलेली आहे.

**वाढदिवसाच्या निमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन:-**

यंदाच्या वाढदिवसानिमित्त मा.बाळासाहेब पाटील यांच्या कार्यकर्ते व सहकाऱ्यांच्या वतीने रक्तदान शिबिर, छत्री व चष्मा वाटप, माता-भगिनींसाठी साडी वाटप, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना वह्या वाटप, मर्दानी खेळ, वृद्धाश्रमात भोजन तसेच हेल्मेट वाटप अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन :-**

तसेच 7 जून रोजी सायंकाळी 6 ते 9 या वेळेत रॉयल गार्डन बँक्वेट हॉल, साईनगर,पनवेल येथे अभिष्टचिंतन सोहळ्यासह संगीत कार्यक्रम व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले असून या कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.












मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६४ ■ रविवार, ०७ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक दिनाचा दिमाखदार सोहळा संपन्न

## शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने रायगड शिवमय



**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या 352व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर आज इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. संभाजीराजे छत्रपती व त्यांच्या सुविद्य पत्नी संयोगिताराजे भोसले आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून हजारो शिवप्रेमींनी उपस्थिती लावली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण रायगड परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आमदार संजय चव्हाण, आमदार अभिजित पाटील, नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उप जिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनी सकाळी 7 वाजता नागारखान्यात युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या शुभहस्ते पारंपरिक वाद्यांच्या गजरात ध्वजारोहण संपन्न झाले. सकाळी 7.30 वाजता राजसदर येथे शाहिरी कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन झाले. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे आगमन झाले आणि त्यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सवमूर्तीचा अभिषेक करण्यात आला. श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारुढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली.



याप्रसंगी युवराज संभाजी छत्रपती महाराज शिवभक्तांना संबोधित केले. शिवराज्याभिषेक पालखी सोहळ्यास प्रारंभ होऊन जगदीश्वर मंदिरात पोहचली. जगदीश्वर मंदिर येथे युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायाला पंढरपूर वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक अभिवादन करण्यात आले. नियोजित कार्यक्रमानुसार सकाळी पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, मर्दानी खेळ आणि भगव्या पताकांनी सजलेल्या या मिरवणुकीने शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह निर्माण केला. त्यानंतर राजसदरावर आयोजित मुख्य सोहळ्यात संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दुपारी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, कीर्तन, शिवचरित्रावर आधारित व्याख्याने आणि लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांना शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती, मावळे आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे संपूर्ण रायगड परिसर शिवकालीन वातावरणाने भारावून गेला होता. सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते. शिवप्रेमींसाठी मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था, सावलीसाठी मंडप आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. किल्ल्यावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवून सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात आली. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह होळीचा माळ येथील नियंत्रण कक्ष, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, राजसदर आणि अन्नछत्राची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी शिवभक्तांशी संवाद साधून त्यांच्या सोयी-सुविधांची विचारपूस केली तसेच सर्व यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या. स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचे स्मरण करून देणारा आणि शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. दुर्गराज रायगडावर आज पुन्हा एकदा शिवकालीन तेज, शौर्य आणि स्वाभिमानाचा जागर अनुभवायला मिळाला.





# नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी

शिव राज्याभिषेकदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल 1 वर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मोठया उत्साहात पार पडले.

हा पुतळा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अलौकिक नेतृत्व आणि दैदिप्यमान वारशाला दिलेली एक आदरांजली असून, तो महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवतो. या ऐतिहासिक सोहळ्याप्रसंगी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालविकास मंत्री अदिती सुनील तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर उपस्थित होते. तसेच भूमिपुत्र स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापक यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर या प्रसंगी प्रामुख्याने उपस्थित होते.

नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (NMI-AL) द्वारे विकसित करण्यात आलेल्या या स्मारकामध्ये 8 फुटांच्या भव्य चबूतऱ्यावर12 फुटांचा कांस्य धातूचा अर्धपुतळा (बस्ट) बसवण्यात आला आहे. नवी मुंबईतील 'आकार आर्ट अँड स्कल्पचर'चे शिल्पकार श्री. नितीन रोहिदास गोर्डे यांनी हा पुतळा साकारला असून, महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाने मान्यता दिलेल्या प्रारूपावर आधारित कॉपर अलॉय ब्रॉन्झ (तांबे मिश्रित कांस्य) मध्ये याची निर्मिती करण्यात आली आहे.सुमारे आठ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत पूर्ण झालेली ही वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील एक प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच विमानतळावर येणाऱ्या देशी-विदेशी प्रवाशांसाठी आणि अभ्यागतांसाठी हे स्थान सांस्कृतिक महत्त्वाचे एक मुख्य केंद्र बनेल यात शंका नाही.



# शिवसेना (उबाठा) पक्षातर्फे करण्यात आली जनतेचे वाया गेलेले पैशाची वसुली करण्याबाबत व जबाबदार अधिकाऱ्यावर एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** सिडकोच्या जमिनीवर विनापरवाना महापालिकेकडून मांडण्यात आलेले शौचालय तोडल्यामुळे जनतेचे वाया गेलेले पैशाची वसुली करण्याबाबत व जबाबदार अधिकाऱ्यावर एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेवून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण व जिल्हाप्रमुख दिपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या गटनेत्या लिना गरड, महानगरप्रमुख ॲड.समाधान काशिद, पनवेल शहरप्रमुख प्रवीण जाधव, नगरसेविका प्रगती कैलास पाटील, उत्तम मोर्बेकर आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना गटनेत्या लिना गरड यांनी सांगितले की, खारघर उत्सव चौक येथील अतिक्रमण करून बांधण्यात आलेले शौचालय हे सिडकोने पाडल्यामुळे जनतेचे वाया गेलेले दोन कोटी 34 लाख कोणाच्या पगारांमधून कट



करणार सत्ताधारी आणि प्रशासनाचा किती अंदाधुंद कारभार चालू आहे हे प्रकरण उजेडात आलेले आहेत. खारघर उत्सव चौक आणि इतर ठिकाणी महापालिका प्रशासनाने शौचालय बांधण्याबाबतचे प्रस्ताव बनवून अधिकृतपणे मीटिंग घेतल्या आणि पालिका प्रशासनाने दोन कोटी 34 एवढ्या खर्चाच्या उत्सव चौक येथील शौचालय बांधणी प्रस्ताव मंजुरी वर शिक्कामोर्तत केले. तसेच इतर ठिकाणीही करोडो रुपयांचे विनापरवाना शौचालय बांधण्यासाठी मंजुरी देण्यात आली. टेंडर काढून कॉन्ट्रॅक्टरला काम सुद्धा दिले गेले. आश्चर्य म्हणजे उत्सव चौक शेजारील जागा सिडकोची होती , तसेच खारघर मध्ये अजूनही सिडको महामंडळच नियोजन प्राधिकरण आहे, हे प्रशासनाला 100% ज्ञात आहे. महानगरपालिका किंवा कंत्राटदाराला सिडकोची परवानगी घ्यावी, असे वाटले नाही. बिनधास्तपणे गुंड लोक जसे जागा पकडून, अतिक्रमण करून, अनाधिकृतपणे बांधकाम बांधतात, त्याच पद्धतीने महानगरपालिकेने आरसीसी बांधकाम पूर्ण केले. सिडकोच्या जमिनीवर सिडकोची कोणतीही परवानगी न घेतल्यामुळे, दिनांक 3 जून रोजी सदरचे बांधकाम सिडको अतिक्रमण विभागाने जमीन दोस्त केले. यामुळे जनतेच्या करोडो रुपयाच्या निधीचे नुकसान झाले. या अतिक्रमण करून अनधिकृत पणे बांधण्यात आलेले शौचालय तोडल्यामुळे जनतेचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. हे नुकसान होण्यासाठी ज्या ज्या अधिकाऱ्यांनी प्रस्तावावर सह्या केलेले आहेत, ज्या ज्या अधिकाऱ्यांनी कॉन्ट्रॅक्टर बरोबर संगणमत केलेले आहे,

त्या सर्व जबाबदार अधिकाऱ्यावर सिडकोच्या जागेवर अतिक्रमण केल्याबद्दल एम आर टी पी कायदे अंतर्गत तात्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच नुकसान झालेल्या करोडो रुपयाची वसुली संबंधित जबाबदार अधिकाऱ्याच्या पगारांमधून कट करून भरपाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कोंकण रेल्वे मार्गावरील सुरक्षेसाठी लोहमार्ग पोलीस ठाण्यांच्या विस्ताराची मागणी

**दैनिक युवक आधार**

**राकेश पाटील मुंबई प्रतिनिधी मुंबई :** कोंकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी रत्नागिरी ते सावंतवाडी टर्मिनस या दरम्यानच्या सर्व रेल्वे स्थानकांवर लोहमार्ग पोलीस ठाण्यांचा विस्तार करण्यात यावा, अशी मागणी आज रेल्वे प्रवासी प्रतिनिधींनी रेल्वे प्रशासनाकडे केली.

शुक्रवार, दिनांक ०५ जून २०२६ रोजी मुंबई येथील लोहमार्ग पोलीस आयुक्तालयात मा. श्री. एम. राकेश कलासागर (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, रेल्वे, मुंबई यांची भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी कोंकण रेल्वे मार्गावरील विविध स्थानकांवर वाढती प्रवासी संख्या, रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचे प्रश्न, महिलांच्या सुरक्षिततेबाबतच्या चिंता तसेच चोरी, फसवणूक व इतर गुन्हेगारी प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी पोलीस यंत्रणेची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.



निवेदनात नमूद करण्यात आले की, रत्नागिरी ते सावंतवाडी टर्मिनस हा कोंकण रेल्वेचा अत्यंत महत्त्वाचा व प्रवासी दृष्टीने संवेदनशील पट्टा आहे. या मार्गावर दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. मात्र अनेक ठिकाणी लोहमार्ग पोलीस यंत्रणेची उपलब्धता मर्यादित असल्याने आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे प्रत्येक प्रमुख रेल्वे स्थानकावर स्वतंत्र लोहमार्ग पोलीस ठाणे अथवा पोलीस चौकी स्थापन करून पोलीस बंदोबस्त वाढविण्याची गरज असल्याचे सांगण्यात आले.

या भेटीदरम्यान पोलीस आयुक्त श्री. कलासागर यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित मागणीचा सकारात्मक विचार करण्यात येईल तसेच आवश्यक त्या स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचे प्रतिनिधींनी सांगितले.

कोंकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेसाठी लोहमार्ग पोलीस ठाण्यांचा विस्तार हा काळाची गरज असून यामुळे गुन्हेगारी घटनांवर आळा बसण्यास मदत होईल. तसेच प्रवाशांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होऊन रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित व विश्वासार्ह बनेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# सिडको प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात निलेश पाटलांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** महाराष्ट्र राज्यातील सर्वात श्रीमंत महामंडळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'सिडको' प्रशासनात प्रचंड भ्रष्टाचार फोफावला असून, प्रकल्पग्रस्तांची कामे पैसे दिल्याशिवाय होत नसल्याचा गंभीर आरोप पनवेलचे माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी थेट राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना पत्र लिहून सिडकोतील भ्रष्टाचाराला आळा घालण्याची विनंती केली आहे.

नुकत्याच झालेल्या अधिवेशनात सिडको क्षेत्रातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करणारे पनवेल आणि उरणचे आमदार यांनी सिडको अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे जाहीर आरोप केले होते. सत्ताधारी आमदारांनीच प्रशासनाविरोधात आवाज उठवल्यामुळे हा विषय जोरदार चर्चेत आला आहे. सिडकोमध्ये साडेबावीस टक्के विभागात काम करणाऱ्या उपजिल्हाधिकारी दर्जाच्या



अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकल्याने या भ्रष्टाचारावर शिक्कामोर्तब झाले होते. मागील 6 महिन्यांत एसीबीच्या कारवाईत 5 सिडको कर्मचारी रंगेहाथ पकडले गेले आहेत, तरीही येथील भ्रष्टाचाराला लगाम लागलेला नाही. निलेश पाटील यांनी पत्रातून तीव्र संताप व्यक्त करताना म्हटले आहे की, लाच घेताना रंगेहाथ पकडलेले अधिकारी पुन्हा सेवेत रुजू होतात आणि सिडकोसारख्या मलाईदार समजल्या जाणाऱ्या विभागात पुन्हा खुर्ची मिळवतात. अशा लाचखोर अधिकाऱ्यांना पाठीशी न घालता, प्रकल्पग्रस्त आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यात यावा. नावडे परिसरातील शेतकऱ्यांनी नुकतेच सिडको भवनमध्ये येऊन आंदोलन केले होते. साडेबारा टक्के भूखंड वाटप सोडत होऊन दोन महिने उलटून गेले, तरी इरादापत्र दिले जात नाही. शेतकऱ्यांकडून विशिष्ट टक्केवारी (कमिशन) घेतल्याशिवाय कोणतीही कामे केली जात नाहीत, असा थेट आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. या पत्राची प्रत माहितीसाठी पीएमओ कार्यालय (), मुख्यमंत्री कार्यालय, नगरविकास सचिव, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक () तसेच स्थानिक खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आणि आमदार विक्रांत पाटील यांनाही पाठवण्यात आली आहे.

उपमुख्यमंत्री यावर काय पाऊल उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माजी सभापती तथा कोकण म्हाडाचे मा. बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** माजी सभापती तथा कोकण म्हाडाचे मा. बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, त्याचाच एक भाग म्हणून विक्रांत पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. राहुल बोर्डे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने दुचाकीस्वारांना सुरक्षा कवच म्हणून हेल्मेटचे वाटप करण्यात आले.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक नागरिक, विशेषतः डिलिव्हरी सेवा देणारे युवक, दररोज मोठ्या प्रमाणात दुचाकीवरून प्रवास करतात. वेळेच्या मर्यादेत सेवा देताना अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व अधोरेखित



करणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.रस्ते अपघातांमध्ये विनाहेल्मेट वाहन चालविणाऱ्यांचे मृत्यू आणि गंभीर दुखापतींचे प्रमाण चिंताजनक आहे. अनेक निष्पाप नागरिकांना केवळ निष्काळजीपणामुळे आपला जीव गमवावा लागतो. याच पार्श्वभूमीवर अपघातांपासून बचाव व्हावा आणि नागरिकांच्या जीविताचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने हेल्मेट वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.



मा. बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यांद्वारे जनजागृती करण्याची ही संकल्पना निश्चितच समाजासाठी आणि विशेषतः तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. समाजाच्या सुरक्षिततेसाठी आणि रस्ते सुरक्षा जनजागृतीसाठी असे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविले जावेत, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# शिवाजी महाराजांचा इतिहास जगायला आणि जिंकायलाही शिकवतो – प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** समर्थ महाविद्यालय, लाखनी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त ‘सुराज्य दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. धनंजय गभणे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. ते म्हणाले, “जगाच्या इतिहासात आपल्या अद्वितीय कार्यकर्तृत्वाने अमिट ठसा उमटविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. अवघ्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात त्यांनी सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले. शत्रूंच्या मनात दहशत निर्माण करताना त्यांनी सातत्याने विजय मिळवले. प्रसंगी स्वतःचा जीव धोक्यात घालून मोहिमा फत्ते केल्या आणि प्रस्थापित सत्तांना आव्हान देत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.”ते पुढे म्हणाले की, “साडेतीनशे वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून घेत



भारतात सुशासनाची मुहूर्तमेढ रोवली. सामाजिक न्याय, लोककल्याण आणि सुशासनाची मूल्ये रुजविण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यामुळेच शिवराज्याभिषेक दिन ‘सुराज्य दिन’ म्हणून साजरा केला जातो. शिवाजी महाराजांचा इतिहास केवळ जगण्याची प्रेरणा देत नाही, तर संकटांवर मात करून यश मिळवण्याची आणि जिंकण्याची शिकवणही देतो.”कार्यक्रमाचे आयोजन इतिहास विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन प्रा. अजिंक्य भांडारकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शीतल कोमेजवार यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. धनंजय गभणे, प्रा. लालचंद मेश्राम, प्रा. मनीषा मदनकर, प्रा. नेहा हुकरे, श्याम पंचवटे तसेच दिनेश सलामे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पिग्मी एजंट चे कमिशन 2.5% संदर्भात घेतला निर्णय मागे घेण्यासाठी सहाय्यक निबंधक कार्यालयावर मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा-** पवनी येथे सहाय्यक उपनिबंधक कार्यालयावर दिनांक 5 जून 2026 ला पवनी तालुका पतसंस्था अभिकर्ता कल्याण संघटनेच्या वतीने मोर्चा काढून सहकार आयुक्त पुणे यांनी 30 मार्च 2026 ला जो जीआर काढला तो जीआर अन्यायकारक असून त्या जीआर मध्ये पिग्मी एजंटचे कमिशन 2.5 टक्के करण्यात आलेली आहे. यापूर्वी पिग्मी एजंट यांना 4 टक्के कमिशन मिळत होते .त्यामुळे या नवीन जीआर मुळे पिग्मी एजंट वर मोठ्या प्रमाणात अन्याय झालेला आहे .तो झालेला अन्याय दूर



करण्यात यावा व त्यांना न्याय देण्यात यावा. सदर मोर्चा हनुमान मंदिर येथून सहाय्यक व उपनिबंधक सहकारी कार्यालय पवनी येथे मोर्चा काढण्यात आला होता. नंतर पवनी येथील तहसीलदार यांना सुद्धा निवेदन देण्यात आले.आंदोलनाची दखल न घेतल्यास यापुढे भव्य आंदोलन करण्याच्या इशारा सुद्धा यावेळी देण्यात आला. सदर मागणीचे निवेदन सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था मुंबई यांना देण्यात आहे. यावेळी संघटनेचे अध्यक्ष विनोद भुरे ,उपाध्यक्ष अमोल भुरे,सचिव प्रशांत लांजेवार व असंख्य पतसंस्था अभिकर्ता कल्याण संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अभिनव प्रतिष्ठान'तर्फे वन अधिकारी अनिल पाटील व पत्रकार योगेश पालोदकर 'अभिनव गौरव' राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड येथील 'अभिनव प्रतिष्ठान'च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव सोहळा संस्थेच्या कार्यालयात नुकताच संपन्न झाला.

या कार्यक्रमात सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल पाटील यांना 'राज्यस्तरीय निसर्ग संवर्धक पुरस्कार - २०२६' आणि 'दै. युवक आधार'चे जिल्हा प्रतिनिधी व 'न्यूज २९ महाराष्ट्र'चे तालुका प्रतिनिधी योगेश पालोदकर यांना स्व. पत्रकार राजेश भैय्या चौबे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ 'राज्यस्तरीय अभिनव गौरव पर्यावरण स्नेही पत्रकार' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल पाटील यांनी सिल्लोड कार्यकाळात एक लाखांहून अधिक रोपांची लागवड करून निसर्ग रक्षणाचे लक्षवेधी कार्य केले आहे . राज्यपुष्प 'जारूळ-तामण' संवर्धन आणि लष्कराच्या 'ग्रीन बटालियन 'सोबत वन्यजीव रक्षणार्थ दिलेले योगदान राज्यासाठी दिशादर्शक ठरले आहे . तसेच, ग्रामीण भागात पर्यावरण विषयावर सातत्याने वार्तांकन, नदी स्वच्छतेच्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग आणि अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी दिलेल्या लेखणीच्या बळाबद्दल पत्रकार योगेश पालोदकर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि मानाचा शेला असे या पुरस्काराचे स्वरूप होते.

हा कार्यक्रम 'सूर्यकिरण अर्बन को -ऑपरेटिव्ह बँक' आणि 'अभिनव प्रतिष्ठान'च्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष किरण पवार, पत्रकार सचिन चौबे, वैद्यकीय अधिकारी डॉ. पांडुरंग चौधरी, नगरसेवक सुनील दुधे, आदर्श शिक्षक संजय बागुल, बँकेचे सरव्यवस्थापक विजय चव्हाण, व्यवस्थापक दीपक पाटील, राजेंद्र चोपडे, प्रशांत गायकवाड, काकासाहेब वाढेकर, बाबुराव चव्हाण, कृष्णा महाजन, महेश पाटील, उमाकांत कुलकर्णी, संदिप पंडित आणि गोपाल गाढवे आदी मान्यवर उपस्थित होते.

## संकटग्रस्त 'वरुण' वृक्षाचे रोपण

**कार्यक्रमाच्या उत्तरार्धात मान्यवरांच्या हस्ते 'वरुण' या वृक्षाचे रोपण करण्यात आले. या वृक्षाचे महत्त्व विशद करताना संशोधक डॉ. संतोष पाटील म्हणाले की, हा वृक्ष 'आययूसीएन' च्या यादीत संकटग्रस्त व दुर्मिळ प्रजातीत मोडतो. पावसाची देवता इंद्र देवाचा प्रिय वृक्ष म्हणून याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. हा वृक्ष मधमाशा आणि फुलपाखरांसाठी अत्यंत उपयुक्त असून, भविष्यात विविध धार्मिक स्थळांच्या परिसरात अशा रोपांची लागवड करण्यात येणार आहे.**

# महावितरण, नफा कमावणारी परंतु सेवेमध्ये सपशेल नापास झालेली महाराष्ट्र राज्यसरकारची वीज कंपनी

**दैनिक युवक आधार**

**ता. कर्जत / वैभव गायकवाड :** महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक वीज कंपन्या आहेत, परंतु महाराष्ट्र राज्यसरकारच्या अधिन असलेली महावितरण (MSEDCL) ही महाराष्ट्रामधील सर्वाधिक वीज ग्राहक असलेली वीज कंपनी आहे. महावितरण जवळ तब्बल ३.५ कोटी पेक्षा जास्त वीज ग्राहक आहेत. मुंबईमधील काही ठिकाणे त्याचबरोबर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महावितरण वीज पुरवठा करते. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये रुपये १,२७,९९७ कोटी इतका महसूल नोंदवीला गेला. इतक्या मोठ्या प्रमाणात महसूल जमा होऊन देखील वीज ग्राहकांना प्रत्येक वेळेस वेठीस धरले जाते.

वीज चोरी करणाऱ्यांवर कारवाई केली जाते, उशीरा वीज बिल भरणा केल्यावर शुल्क (penalty) आकारले जातात, महिन्याभराचे बील भरले नाही तर वीज कापली जाते, मिटर काढून घेतला जातो अशा अनेक कारवाया महावितरणद्वारे केल्या जातात.

**पण, महावितरणच्या भोंगळ कराभाराबद्दल काय?**

कर्जत तालुक्यामध्ये गेल्या २ महिन्यापासून विजेचा भारीच लपंडाव सुरु आहे. कधी भर उन्हात, तर कधी सकाळी, कधी दुपारी, सायंकाळी, तर कधी मध्यरात्री अश्या सतत वीज जाण्याने संपूर्ण कर्जत तालुक्यातील जनता संतप्त आहे. कधी अतिपावर झाला म्हणून, कधी ट्रान्सफॉर्मर निकामी झाला म्हणून, तर कधी तांत्रिक बिघाड झाल, कारण काहीही असो वीज घालविली जातेच. पावसाच्या हंगामात खबरदारी म्हणून पावसाला सुरुवात झाली की लगेच वीज घालविली जाते. महावितरण ची वीज कधी दिवसभर उपयोगात आली असावी हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. दिवसभरात कमीत कमी ४ ते ५ तास वीज नसतेच मुळात (एखादा अपवाद असावा). आणि उन्हाळयाच्या महिन्यामध्ये तर अनेकदा रात्रभर वीज नसते तो भयावह त्रास वेगळा. वीज नसली तरी बील मात्र तेवढेच येणार जेवढे प्रत्येक महिन्यास येते. या सर्व गोष्टींचा ग्राहकांना मात्र नेहमीच त्रास सहन करावा लागतो.

**भला मोठा नफा कमाविणारी वीज कंपनी, सेवेत नापास का?**

तांत्रिक बाबींकडे केलेलं दुर्लक्ष, ग्राहक सेवा केंद्रकांडून वेळेवर न मिळणारी मदत, ग्राहकांना उडवाडावीची उत्तरे, तात्काळ उपाययोजनांचा उडालेला फज्जा, ग्राहकांना फक्त वेठीस धरण्यासाठी वाटेल ते नियम आणि बंधनं, महसूल जास्त आणि वेळेवर वसुल करता यावा म्हणून स्मार्ट मिटर नावाचा अजब खेळ सुरु केला आहे म्हणजे थकीत वीज बील असल्यास आपोआप विद्युत कनेकशन बंद होणार, Prepaid (आगाऊ बील भरणा) योजना सुरु करण्याची नवीन योजना सुरु करण्याचा घाट बांधला जात आहे म्हणजे, जितके आगाऊ पैसे (मोबाईल रिचार्ज सारखे) भरणार तेवढेच दिवस वीज मिळणार. त्यामध्ये एखाद दिवस वीज नसली तर तो भरून तर देणार नाहीच आणि महिना २८ दिवस मोजायला मोकळे.

मुंबई सह अनेक मेट्रो शहरांमध्ये ज्या प्रकारे जमिनीअंतर्गत विजेच्या तारा असतात ती पद्धत ज्यामध्ये कमी धोके आहेत, ऊन वारा पाऊस याचा कोणताही परिणाम होत नाही, एकदा का जमिनीअंतर्गत तारा प्रवाहित झाल्या त्यांना देखभालीची गरज सुद्धा खूप कमी लागते तरी महावितरण ही पद्धत राबविण्यास का बरं टाळाटाळ करत असावी? तज्ञ आणि अनुभवी लोकांच्या मते, असे महावितरण कधीच करणार नाही, कारण देखभाल आणि इतर गोष्टीमध्ये सरकार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांचे कमिशन यामुळे मुकेल. या कारणास्तव महावितरण ही गोष्ट नफ्यामध्ये असून सुद्धा करणार नाही.

**त्रासलेल्या वीज ग्राहकांचे प्रश्न?**

वीज बील एखाद महिना थकले की लगेच अरेरावी करणारे कर्मचारी येतात आणि ग्राहकाला न जुमानता वीज कनेक्शन कापून मिटर घेऊन जातात.

हेच दिवस दिवस भर जेव्हा महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे वीज नसते तेव्हा मात्र विजेच्या बिलात कोणतीही सवलत का दिसत नाही? किंवा संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी यांच्यावर कारवाई का केली जात नाही? जेव्हा विजेचा वापर जास्त असतो तेव्हा ही यंत्रणा आधीच तयार का नसते? संकटकाळात कर्मचारी सुट्टीवर असतात नाहीतर अधिकारी सुट्टीवर असतात जाब विचारणार कोणाला? कधी विजेचे खांब कोसळतात, तर कधी उच्च दाबाच्या तारा कोसळून लोकांचे जीव जातात याची जबादारी महावितरण का घेत नाही?

सामान्य जनतेला कितीही त्रास झाला तरी महावितरण काही सुधारणार नाही. महावितरणचे लक्ष मात्र ग्राहकांकडून पैसे उकळण्यात आणि सरकारी तिजोरी भरण्यातंच तरबेज आहे हे तितकेच खरे आहे.

# हंगरफ्रीवर्ल्ड' उपक्रमाने दैनंदिन अन्न वितरण मोहिमेच्या परिवर्तनात्मक प्रभावावर प्रकाश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जागतिक भूक दिनानिमित्त मलाबार ग्रुपच्या मानवतावादी उपक्रम 'हंगरफ्रीवर्ल्ड'ने आपल्या स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्रामचा प्रभाव "रिहॅबिलिटेशन इम्पॅक्ट रिपोर्ट: इम्पॅक्ट स्टोरीज – एका दैनंदिन जेवणामुळे कसे बदलते आयुष्य" या अहवालाद्वारे अधोरेखित केला. या अहवालात, थनलसंस्थेद्वारे प्रत्यक्ष स्तरावर राबविण्यात येणाऱ्या दैनंदिन अन्न वितरण मोहिमेमुळे रस्त्यावर राहणाऱ्या असुरक्षित व्यक्तींना बचाव, वैद्यकीय मदत, निवाऱ्याची सुविधा, सन्मानाची पुनर्स्थापना आणि कुटुंबीयांशी पुनर्मिलन कसे शक्य झाले, हे नोंदविण्यात आले आहे.



स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्रामची सुरुवात पौष्टिक अन्नाची नियमित उपलब्धता करून भुकेच्या समस्येला उत्तर देण्यासाठी करण्यात आली होती. कालांतराने हा उपक्रम अधिक सखोल काळजी आणि सहाय्याचा दुवा बनला आहे. दैनंदिन संपर्कामुळे क्षेत्रीय कार्यकर्त्यांना लाभार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण करता येतो, त्यांच्या आरोग्य आणि वर्तनातील बदल ओळखता येतात, अडचणींची जाणीव होते आणि त्यांना पुनर्वसन सेवांशी जोडता येते. या अहवालात कार्यक्रमाच्या मुख्य विश्वासाला अधिक बळ देण्यातआले आहे की, सातत्याने आणि मानवी संवेदनशीलतेने दिलेले एक जेवण मोठ्या परिवर्तनाची सुरुवात ठरू शकते.

हा कार्यक्रम सध्या भारतातील 20 राज्यांमध्ये आणि सहा GCC देश, अमेरिका, युनायटेड किंगडम आणि झांबियायांसह नऊ देशांमध्ये कार्यरत आहे. मायक्रो लर्निंग सेंटर्स आणि स्ट्रीटमील डिस्ट्रीब्युशन प्रोग्राम यादोन प्रमुख उपक्रमांद्वारे 1,43,000 लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आले आहे.

या उपक्रमाबाबत बोलताना मलाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद म्हणाले, "एक जेवण साधे वाटू शकते, परंतु जेव्हा ते सातत्याने आणि मानवी संवेदनशीलतेने दिले जाते, तेव्हा ते फक्त अन्न राहत नाही. हंगरफ्रीवर्ल्डच्या माध्यमातून आम्ही पाहिले आहे की नियमित संपर्क कसा विश्वास निर्माण करतो आणि तो विश्वास पुनर्वसन, आरोग्यसेवांपर्यंत पोहोच, भावनिक आधार आणि सन्मान पुनर्स्थापनेचा पाया बनतो. या कथा असुरक्षित समुदायांशी सातत्यपूर्ण संवादाचे महत्त्व अधोरेखित करतात, जिथे करुणा आणि सातत्य एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याची दिशा अर्थपूर्णपणे बदलू शकते.

# जागतिक पर्यावरण दिनी पनवेलच्या कल्पतरू सोसायटी परिसरात वृक्षारोपण

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पनवेल शहरात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याच दिनानिमित्त देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या 'एक पेड माँ के नाम' या आवाहनाला प्रतिसाद देत कोशिश फाउंडेशनच्या वतीने पनवेलमधील कल्पतरू सोसायटी परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेचा मुख्य शुभारंभ भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला.यावेळी त्यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि वसुंधरेला हिरवेगार करण्यासाठी प्रत्येकाने या अभियानात सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. या वेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, शहर अध्यक्ष तथा





नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, श्वेता बहिरा, माजी नगरसेवक सुनील बहिरा, प्रभाकर बहिरा, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर सरचिटणीस अमित ओझे, रुपेश नागवेकर, प्रीतम धनाजी म्हात्रे, आदेश ठाकूर, प्रशांत शेट्ये, रोहित आटवणे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

# आकोट येथे मराठा सेवा संघाचे वतीने ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन साजरा !!

## रक्तदान शिबिराचे आयोजन,वीर छत्रपती ग्रुपचा स्तुत्य उपक्रम !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे आकोट प्रतिनिधी:** मराठा सेवा संघ शाखा अकोटच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.




स्थानिक छ.शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पुजन व हारार्पण तालुकाध्यक्ष शिवश्री राममुर्ती वालसिंगे यांनी केले. यावेळी सचिव शिवश्री प्रकाश बिहाडे,प्रा.वाल्मिक भगत,प्रा. डि.आर.साबळे,प्रा.सुरेश कराळे,प्रा.संदिप बोबडे,प्रा.अनंत मरकाळे,डॉ. सुहास कुलट, डि.ओ.म्हैसने,शरद पांडे,बंडू पा.कुलट,रामदास मंगळे,उमेश चोरे,विजय कुलट,गजानन भांबुरकर,मनोज लोडम तसेच वीर छत्रपती ग्रुप अकोटचे तरुण कार्यकर्ते तसेच आकोट परिसरातील शिवभक्त यांनी अभिवादन केले.

याप्रसंगी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला यावेळी शिवश्री मनोज लोडम यांची ६ वर्षीय कन्या कु.स्मितेजा लोडम हिने ओजस्वी वाणीत शिवगर्जना सादर केली.

वीर छत्रपती ग्रुपच्या वतीने रक्तदान शिबीर :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून अकोट शहर व तालुक्यातील समावेश असलेल्या तरुण शिवभक्तांच्या वीर छत्रपती ग्रुपच्या वतीने भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले.शिबीराचे उद्धाटन प्रथम रक्तदाते शिवश्री शरद पांडे याचे हस्ते शिवाजी महाराजांचे पुजन करण्यात आले.यावेळी माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे,राजुभाऊ नागमते,मराठा सेवा संघाचे सदस्य व वीर छत्रपती ग्रुपचे सर्व सदस्य व शिवभक्त उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या यशस्वी आयोजना बद्दल आकोट परिसरातील नागरिकांकडून वीर छत्रपती ग्रुपचे भर भरून कौतुक होत आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रुपच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सणसर सोसायटीत कर्जवसुलीतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सचिवांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** सणसर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने आज मोठ्या उत्साहात शिवराज्याभिषेक सोहळा दिन साजरा करण्यात आला. यावेळी सोसायटीने मागील दीड महिन्यांच्या कालावधीत थकीत कर्जवसुलीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचाही गौरव करण्यात आला.

सणसर सोसायटीने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने एक कोटी रुपयांहून अधिक थकीत कर्जाची वसुली करण्यात यश मिळविले. या यशामध्ये मोलाचे योगदान दिल्याबद्दल सोसायटीचे सचिव संजय सपकाळ व तुषार निंबाळकर यांचा चेअरमन सीमावहिनी निंबाळकर, व्हाईस चेअरमन तसेच सर्व संचालक मंडळाच्या वतीने भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी चेअरमन, सर्व संचालक आणि सचिव यांनी एकत्रितपणे केलेल्या नियोजनामुळे कर्जवसुलीची मोहीम यशस्वी झाल्याचे सांगण्यात आले भविष्यातही अशाच पद्धतीने कार्य करत सोसायटीची आर्थिक घडी अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले जातील.तसेच सोसायटीच्या सभासदांना चांगला लाभांश मिळावा, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे चेअरमन,संचालक आणि सचिव यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले.या कार्यक्रमासाठी माजी चेअरमन विक्रम भैय्या निंबाळकर यांनी मनोगत व्यक्त करत सोसायटीच्या कार्याचे कौतुक केले.तसेच माजी बँक अधिकारी तानाजी जाधव साहेब,माजी चेअरमन सुशील भैय्या निंबाळकर, परशुराम नाना रायते, सोमनाथ जगताप, माजी सरपंच राहुल काळे, व्हाईस चेअरमन सचिन फुले, सोमनाथ उर्फ पिंटू गुप्ते, नूतन स्वीकृत संचालक किसन नलवडे, जगदीश कांबळे, सचिव संजय सपकाळ, तुषार निंबाळकर, तात्या साळुंखे, हरी रायते आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून,सणसर सोसायटीच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार यावेळी चेअरमन सिमावहिनी निंबाळकर यांनी व्यक्त केला.

# लोकशाही भारत लीडरशिप समिटमध्ये माहूरचे नगराध्यक्ष फिरोज भैय्या दोसानी यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/सय्यद इसा :** लोकशाही वृत्तवाहिनीकडून माहूर नगरपंचायतीचे विद्यमान नगराध्यक्ष फिरोज हाजी कादर दोसानी यांना त्यांच्या उत्कृष्ट लोकाभिमुख कार्याची दखल घेत "लोकशाही भारत लीडरशिप समिट" या प्रतिष्ठित कार्यक्रमात आज, शनिवार दि. ६ जून रोजी मुंबई येथे पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

फिरोज भय्या दोसानी हे माहूर शहराच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. मागील तीन




पंचवार्षिकांपासून नगरसेवक म्हणून त्यांनी जनतेची सेवा केली असून तब्बल सात वर्षे नगराध्यक्ष पदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. सध्या विद्यमान नगराध्यक्ष म्हणून ते शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विकासकामे राबवत आहेत.

त्यांच्या सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख दृष्टीकोन आणि जनसामान्यांशी असलेल्या सुसंवादामुळे त्यांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.

पुरस्कार वितरण सोहळा आज शनिवार रोजी सकाळी ११ ते १२ वाजेदरम्यान मुंबई येथे आयोजित करण्यात आला .

माहूर शहरासाठी अभिमानास्पद ठरलेल्या या सन्मानाबद्दल विविध स्तरातून फिरोज भय्या दोसानी यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ग्रामपंचायतने अचूक कर आकारणी करणे हे ग्रामपंचायतीची वैधानिक जबाबदारी- समीर वाठारकर, गटविकास अधिकारी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारती आणि अकृषीक वापराच्या जमिनी यांच्यावर ग्रामपंचायत अधिनियम अंतर्गत ग्रामपंचायत मार्फत कर आकारणी करणे आणि आकारणी केलेला कर वसूल करण्याबाबतच्या सूचना समीर वाठारकार, गटविकास अधिकारी पंचायत समिती, पनवेल यांनी सर्व ग्रामपंचायतींना केल्या आहेत.

ग्रामपंचायतींना कर आकारणीचा, कर वसुलीचा आणि त्याच्या वापराचा अधिकार प्राप्त असून हा घटनात्मक अधिकाराच्या आधारे राज्य कायद्याने प्रदान केलेला वैधानिक अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही तरतूदिन्वये ग्रामपंचायतीचा कर आकारणीचा अधिकार निष्कासित होत नाही. आणि कोणत्याही विशेष नियोजन प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे ग्रामपंचायतीची कर आकारणी गैर लागू ठरत नाही. अकृषिक वापराच्या जमिनीबाबत ही ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आलेल्या कर आकारणीमुळे दुबारकर, दुहेरीकर अशी बाब निर्माण होत नाही. गावाच्या हद्दीतील सर्व इमारतींवर आणि अकृषिक वापर सुरू असलेल्या जमिनीवर कर आकारणी करणे आणि कराची वसुली करणे ही ग्रामपंचायतची प्रमुख कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र ग्रामपंचायतीकडून अचूक कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारतींवर कर आकारणी करताना काही इमारती कर आकारणी प्रक्रिया दरम्यान वगळल्या गेल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच कर आकारणीनंतर वाढीव बांधकाम झाल्याचे ही आढळून येते. त्यामुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मिळकतीचे भांडवली मूल्यांकन काढून त्यावर ग्रामसभेमार्फत निश्चित करण्यात आलेल्या दराने कर आकारणी करण्याच्या सूचना केल्या आहेत.

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारती अकृषिक वापर सुरू असलेल्या जमिनी ह्या अधिकृत किंवा अनधिकृत/अतिक्रमित असल्या तरी ग्रामपंचायतीने कर आकारणी करणे अनिवार्य आहे. कर आकारणी करताना घेतलेल्या नोंदीमुळे सदरची इमारत अनधिकृत/अतिक्रमित असल्यास ती अधिकृत होत नाही.

# कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडतर्फे मोहा येथील बीकेपी स्कूलला बहुमूल्य शैक्षणिक मदत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** संकल्प चॅरिटेबल ट्रस्टची मोहा गावातील बीकेपी स्कूल ही अतिशय अल्प फी घेऊन गरिबातल्या गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याचे काम करते. या स्कूलचे संस्थापक-अध्यक्ष निरंत पाटील हे शरीराने दिव्यांग आहेत, परंतु त्यांनी परिस्थितीवर मात करून गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. त्यामुळे त्यांची शाळेच्या प्रगतीसाठी सतत धडपड सुरू असते. मात्र काही भौतिक आणि शैक्षणिक सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना पुरविताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. मात्र शाळेचा शिक्षकवृंद प्रिन्सिपॉल जयश्री वाजेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रगती करीत आहे. त्यामुळे बीकेपी स्कूल मोहा येथील शाळेला प्रोजेक्टर, वॉटर प्युरिफायर, खुर्च्या, लायब्ररी आणि लॅबसाठी कपाटे, स्टाफसाठी लॉकर अशी बहुमूल्य शैक्षणिक मदत कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडतर्फे





शुक्रवारी (या. ५) करण्यात आली. यावेळी कंपनीची ५० जणांची टीम उपस्थित होती. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत हसत-खेळत खेळ खेळून आपल्या बालपणात हरवले होते. विद्यार्थ्यांना त्यांनी भेटवस्तूही दिल्या. विशेष म्हणजे सीसीटीव्ही कॅमेरे कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडच्या टीमने बसवून दिले. इतर शैक्षणिक साहित्याची वाहतूकही त्यांच्या टीमने केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत स्नेहभोजन केले. त्यामुळे बीकेपी स्कूलचे विद्यार्थी आणि शिक्षकवृंद कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडच्या सहकार्यामुळे भारावून गेले होते.यावेळी कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडचे मुंबई आणि पुणे विभागाचे एसडीएम संदीप कुमार म्हणाले, "आमची कंपनी जागतिक पातळीवर कार्यरत आहे. ती क्वॉलिटी, सर्विस आणि समाज बांधिलकी, याबाबतीतही आघाडीवर आहे. जून महिन्यातील पहिला शुक्रवार संपूर्ण जगभर ही कंपनी सामाजिक बांधिलकीपोटी एक दिवस समाजासाठी, या उक्तीनुसार काम करते. आम्ही एकेदिवशी येऊन बीकेपी स्कूलची पाहणी केली आणि खरोखरच तिथे ज्या शैक्षणिक गरजेच्या वस्तूंची गरज होती, त्या आम्ही बीकेपी स्कूलला दिल्या." यावेळी कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडचे डिझाईन इंजिनियर गजानन पवार आणि त्यांची टीम उपस्थित होती. त्यांचे बीकेपी स्कूलच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.शाळेचे ट्रस्टी संकल्प पाटील, रामकृष्ण हुद्दार, तसेच मनोहर पाटील, ज्येष्ठ पत्रकार कृष्णा पाटील आणि पदाधिकाऱ्यांनी कन्वर्जंट इंडिया प्रा. लिमिटेडचे आभार मानले. यावेळी बीकेपी स्कूलच्या सर्व शिक्षकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# बालमजुरीत अडकलेल्या 3 बालकांचे सुरक्षित पुनर्वसन

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** उन्हाळ्याच्या सुट्टीत थोड्याशा पैशाच्या आशेने मध्य प्रदेश राज्यातील खांडवा जिल्ह्यातील 3 बालके बीड जिल्ह्यात आली होती. ही बालके गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील एका हॉटेलवर काम करत असल्याची माहिती सतर्क नागरिकांनी गोपनीयपणे गेवराई पोलीस ठाण्यास दिली. प्राप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने कारवाई करून संबंधित बालकांची सुटका (रेस्क्यू) केली व त्यांना पुढील संरक्षणासाठी बाल कल्याण समिती बीड यांच्या आदेशाने शासकीय निरीक्षण गृहात दाखल करण्यात आले. या प्रकरणात बालमजुरीस प्रवृत्त करणाऱ्या संबंधित आरोपींविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रिया तसेच बाल संरक्षणाशी संबंधित सर्व आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्यात आली.

मा. बाल कल्याण समिती, बीड यांनी



सदर बालकांना त्यांच्या मूळ गावी सुरक्षितपणे पोहोचविण्याचे आदेश दिल्यानंतर युवा ग्राम विकास मंडळ, केज संस्थेचे संतोष रेपे, प्रकाश काळे, अस्मिता इंगळे आणि संभाजी वळसे यांनी समितीकडून एस्कॉर्ट ऑर्डर प्राप्त करून सुमारे 600 किलोमीटरचा प्रवास केला. त्यांनी तिन्ही बालकांना सुरक्षितपणे मध्य प्रदेशातील खांडवा येथील बाल कल्याण समितीसमोर हजर केले. आवश्यक पडताळणी व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर बालकांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले.या संपूर्ण प्रक्रियेत बालकांचे संरक्षण, पुनर्वसन आणि सुरक्षित हस्तांतरण यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी फारुख शेख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सुधीर निर्मळ, बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे तसेच सदस्य संतोष वारे, सुरेश राजहंस आणि छाया गडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

युवा ग्राम विकास मंडळ, केज ही संस्था जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन्स (JRC) या देशव्यापी बालहक्क संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या अलायन्सची भागीदार संस्था असून बीड व धाराशिव जिल्ह्यांमध्ये बाल संरक्षण, बालमजुरी निर्मूलन, बालविवाह प्रतिबंध, बाल तस्करी प्रतिबंध तसेच बालहक्क संरक्षणाच्या विविध उपक्रमांवर सातत्याने कार्यरत आहे.बालमजुरी ही बालकांच्या शिक्षण, आरोग्य व सर्वांगीण विकासासाठी घातक असून अशा घटना निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ प्रशासन, पोलीस यंत्रणा किंवा बाल हेल्पलाईन 1098 वर संपर्क साधून सहकार्य करावे, असे आवाहन संतोष वारे- सदस्य बाल कल्याण समिती बीड यांनी केले.

# श्रीराम माध्यमिक विद्यालयात स्कॉलरशिप परीक्षात यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नेवासा प्रतिनिधी/लखन वाल्हेकर** : जनता शिक्षण प्रसारक मंडळ, दहिगावने संचालित श्रीराम विद्यालय, देवगाव येथे संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील व मा. आ. श्री. चंद्रशेखर घुले पाटील यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता पाचवीच्या स्कॉलरशिप परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा गौरव सोहळा तसेच इयत्ता पाचवीच्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत आणि इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी जादा तासिकांद्वारे अभ्यासक्रम प्रारंभ कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ५ जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. कचरदास गुंदेचा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी स्कॉलरशिप विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांचा



सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी व शैक्षणिक प्रगतीस चालना देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.यावेळी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. सोपान सतरकर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त, जिद्द आणि परिश्रम यांच्या बळावर कोणतेही यश प्राप्त करता येते, असे प्रतिपादन केले. तसेच नुकतीच मुख्याध्यापक पदाची धुरा स्वीकारलेले श्री. एम. व्ही. शिंदे सर यांचा व उपस्थित पालकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री. सिकंदर शेख सर यांनी केले. त्यांनी कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालय सदैव प्रयत्नशील असून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. बाळासाहेब भगत सर यांनी केले.या प्रसंगी श्रीमती सुनिता कर्डिले मॅडम, श्री धिरज शिंदे सर, प्रा. किरण निकम सर, भगवानराव निकम, मल्हारी निकम, शंकर गायकवाड तसेच अनेक पालक, ग्रामस्थ व शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच शाळेतील माजी विद्यार्थी म्हणून पत्रकार लखन वाल्हेकर यांचा सन्मान करण्यात आला.या प्रेरणादायी कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाबाबत उत्साह निर्माण झाला असून स्कॉलरशिप व दहावीच्या विद्यार्थ्यांना यशाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाली.

# धरणा गावातील गटारपाण्याच्या समस्येवर माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने तातडीने उपाययोजना

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल तालुक्यातील धरणा गावामध्ये नाल्यातील गटाराचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोय सहन करावी लागत होती. विशेषतः आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची



शक्यता निर्माण झाली होती. या समस्येची गांभीर्याने दखल घेत ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष तथा रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. आणि त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यात आली.

यावेळी माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांनी नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून पुढील काळातही आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, अशी ग्वाही दिली. गावातील स्वच्छता, आरोग्य आणि विकासाच्या दृष्टीने अशा समस्यांचे तातडीने निराकरण करणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी महानगरपालिकेचे कर्मचारी, सुरेश पोरजी, नेहाल ठाकूर, उमेश मढवी, काथोर मढवी, सूरज पाटील, हनुमान पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमित्र सरदार गुरुजी यांचे निधन

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी धारगाव -** येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुलाबराव उपाख्य लोकमित्र सरदार गुरुजी, धारगाव यांचे वृद्धापकाळाने परवा निधन झाले. 26सप्टेंबर 1946 रोजी आकोला जिल्ह्यातील गोरेगाव येथे त्यांचा जन्म झाला परंतु भंडारा जिल्ह्याला त्यांनी आपली कर्मभूमी मानून मानवाधिकार, अंधश्रद्धा निर्मूलन, भ्रष्टाचार, व्यसनमुक्ती आणि विविध विषयांवर जनआंदोलन करून वंचितांना न्याय मिळवून



देण्याचा प्रयत्न केला. फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले. समता सैनिक दलाचा सैनिक म्हणूनच ते कार्यरत होते. पत्रकार म्हणूनही त्यांनी


सर्वसामान्यांचा आवाज बुलंद केला. विविध सामाजिक संघटना स्थापन करून त्यांनी निरंतर समाजाचे उदबोधन आणि प्रबोधन केले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वासंती सरदार यांचे ते पती होत. धारगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. आदरांजली सभेतून त्यांच्या कार्यावर कार्यकर्त्यांनी प्रकाश पाडून आपली श्रद्धांजली वाहिली.

# ओरायन मॉलच्या यशस्वी १० व वर्धापन दीनानिमित्त आयोजित "लाभले आम्हास भाग्य" कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल येथील ओरायन मॉलच्या यशस्वी १० वर्षांच्या प्रवासानिमित्त आनंद सोहळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. गेल्या दशकभराचा हा प्रवास आव्हानात्मक आणि बरेच काही शिकवणारा ठरला असला, तरी ग्राहकांच्या, नागरिकांच्या आणि सुहृदांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मॉलने ही यशस्वी वाटचाल पूर्ण केल्याची भावना व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली.

या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या दिमाखदार सोहळ्याला भाजपचे प्रदेश



सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाबाळासाहेब पाटील, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून ओरायन मॉल परिवाराला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या बरवा मनोरंजन मंडळी प्रस्तुत "लाभले आम्हास भाग्य" या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणात सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे, मृण्मयी देशपांडे, गौतमी देशपांडे आणि संगीतकार अजित परब या महाराष्ट्राच्या लाडक्या कलाकारांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने रंगत आणली. या कार्यक्रमावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिलीप करेलिया, मनन परुळेकर यांच्यासह पनवेलकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डिंग्रजवाडी वनविभाग क्षेत्रात २ हजार २ वृक्षांची लागवड

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : वाढते नागरीकरण, प्रदूषण आणि हवामान बदलाच्या गंभीर आव्हानांवर मात करण्यासाठी डिंग्रजवाडी वनविभाग परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घनदाट नागरी वन (Dense Urban Forest) उभारण्याच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला प्रारंभ करण्यात आला. स्थानिक कंपन्यांच्या सहकार्याने तब्बल २ हजार २ वृक्षांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा आदर्शवत संदेश देण्यात आला.डिंग्रजवाडी वन परिसरातील सुमारे दोन एकर जागेवर हा वृक्षारोपण प्रकल्प राबविण्यात येत असून, या माध्यमातून हरित क्षेत्र वाढविणे, जैवविविधतेचे संवर्धन करणे आणि पर्यावरणीय संतुलन राखण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. या घनदाट वनामुळे हवेच्या गुणवत्तेत सुधारणा, कार्बन शोषण क्षमतेत वाढ तसेच स्थानिक जैवविविधतेला पोषक वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे.

या उपक्रमासाठी शिरूर वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) मा.निळकंठ गव्हाणे,डेप्युटी आरएफओ सौ. रूपाताई जगताप,मेजर मा.सोपान अनसुने वनपाल मे. मा. झिरपे, वन कर्मचारी दादा जाधव, परिसरातील विविध कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी, डिंग्रजवाडीचे माजी सरपंच मा. यशवंत गव्हाणे, सा. का. नारायण गव्हाणे, सणसवाडीचे उपसरपंच मा.राजाराम दरेकर,कोरेगाव भीमा येथील सा.का.मा.पोपट ढेरंगे,यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष खंडुआण्णा भारत गव्हाणे तसेच ग्रामस्थ व इतर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आरएफओ मा. निळकंठ गव्हाणे यांनी सांगितले की, "पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. अशा प्रकारची घनदाट जंगले ही मानवाची फुफ्फुसेच आहेत. केवळ वृक्षलागवड करून थांबणे हा या उपक्रमाचा उद्देश नसून, लागवड केलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारी वनविभाग, स्थानिक कंपन्या, प्रशासन आणि नागरिकांनी स्वीकारणे आवश्यक आहे."

या संयुक्त प्रयत्नांमुळे शेजारील गावांचा परिसर भविष्यात समृद्ध हरित पट्टा म्हणून विकसित होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभागाचे प्रभावी उदाहरण निर्माण झाले आहे.

# येवदा कृषी केंद्रावर कृषी विभागाचा धडक कारवाईचा बडगा

## रोहित अँग्रोचा खत विक्री परवाना ९० दिवस निलंबित; बिनजमीनधारकांना युरिया, साठ्यात तफावत उघड

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : दि.4 जून २०२६ दर्यापूर तालुक्यातील येवदा येथील

खताच्या अनियमित विक्रीला आळा घालण्यासाठी कृषी विभागाने दर्यापूर तालुक्यात मोठी कारवाई केली आहे. येवदा येथील मे. रोहित अँग्रो कृषी केंद्राचा रासायनिक खत विक्री परवाना जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा परवाना प्राधिकारी, अमरावती यांनी ९० दिवसांसाठी निलंबित केला आहे. खत नियंत्रण आदेश १९८५ आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५ अंतर्गत हा आदेश पारित झाला आहे. परवाना क्रमांक LC-FRD0720222466AMV असले हे केंद्र आता तीन महिने खत विकू शकणार नाही.

**भरारी पथकाच्या तपासणीत धक्कादायक बाबी**

कृषी अधिकारी पंचायत समिती दर्यापूर आणि जिल्हास्तरीय भरारी पथकाने अचानक तपासणी केली असता अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या. त्याच्या अहवालाच्या आधारे जिल्हा कृषी कार्यालयाकडे कारवाईचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

**तपासणीतील मुख्य मुद्दे असे:**

1. बिनजमीनधारकांना मोठी विक्री: नावावर शेती नसलेल्या ५ व्यक्तींना प्रत्येकी २० बॅगप्रमाणे १० बॅग युरिया विक्री झाल्याची नोंद मिळाली. खत फक्त शेतकऱ्यांनाच क्षेत्रानुसार देणे बंधनकारक असताना हा नियम धाब्यावर बसवला गेला.

2. क्षेत्रापेक्षा जास्त वाटप: अल्पभूधारक शेतकऱ्यांना त्यांच्या क्षेत्राच्या तुलनेत तब्बल २४० बॅग युरिया विकल्याचे दिसून आले. यामुळे गरजू शेतकऱ्यांपर्यंत खत पोहोचण्यात अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

3. पॉस-बिल जुळत नाहीत: शेतकऱ्यांच्या आधार बायोमेट्रिकवरून पॉस मशीनमध्ये २० बॅग नोंद झालेली असताना प्रत्यक्ष बिलात कमी प्रमाण दिसले. ई-नोंदणी आणि कागदी व्यवहारात स्पष्ट तफावत होती.

4. बोगस स्त्रोत नोंदणी: दुकानात विक्रीस ठेवलेल्या खत कंपन्यांचे सर्व स्त्रोत परवाना नोंदणीत समाविष्ट नव्हते. कृषी अधिकाऱ्यांनी विचारणा केली असता दाखवलेला अर्ज ई-परवाना प्रणालीवर अस्तित्वातच नसल्याचे निष्पन्न झाले.

5. *साठ्यात मोठी तफावत*: साठा रजिस्टरमध्ये दाखवलेली शिल्लक आणि दुकानातील प्रत्यक्ष साठा यात मोठा फरक आढळला. यामुळे काळाबाजाराची शक्यता तपासली जात आहे.

**सुनावणीत संचालकांची बाजू**

९ मे आणि २६ मे २०२६ रोजी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात सविस्तर सुनावणी झाली. यावेळी जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, ता.कृषी अधिकारी आणि केंद्र संचालक रोहित हरीकिशोर राठी उपस्थित होते.

सुनावणीत राठी यांनी काही मुद्दे मान्य केले. नावावर जमीन नसले तरी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना खत दिल्याचे त्यांनी सांगितले. क्षेत्र पाहून खत देण्याचे स्पष्ट आदेश पूर्वी मिळाले नव्हते, असा खुलासा त्यांनी केला. बायोमेट्रिक जुळत नसल्याने उपस्थित व्यक्तीच्या नावाने बिल काढल्याचेही त्यांनी कबूल केले. मात्र परवाना प्राधिकाऱ्यांना ही कारणे समाधानकारक वाटली नाहीत.

**निलंबनानंतरचे परिणाम**

आदेशानुसार निलंबन कालावधीत एकही बॅग खत विकल्यास ते थेट खत नियंत्रण आदेशाचे उल्लंघन ठरेल. त्यासाठी फौजदारी कारवाईसह परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याचीही तरतूद आहे. आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांत विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग यांच्याकडे अपील करण्याचा अधिकार केंद्र चालकाला देण्यात आला आहे.

**शेतकरी वर्गात समाधान, इतर केंद्रांना इशारा**

या कारवाईमुळे दर्यापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून युरिया तुटवडा आणि काळाबाजाराच्या तक्रारी वाढल्या होत्या. शेतकरी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "अशा धाडी सर्व तालुक्यात नियमित व्हायला हव्यात, म्हणजे खऱ्या शेतकऱ्याला वेळेवर खत मिळेल."कृषी विभागानेही इतर सर्व कृषी केंद्रांना इशारा दिला आहे. साठा रजिस्टर, पॉस नोंदी, स्त्रोत प्रमाणपत्र आणि क्षेत्रानुसार विक्री याबत काटेकोर पालन करावे, अन्यथा कडक कारवाई होईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.या एका कारवाईमुळे संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील खत विक्री व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, पारदर्शकता वाढवण्यासाठी आणखी भरारी पथके सक्रिय होण्याची शक्यता आहे.

# देपुळ ग्रामपंचायतीत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा!

## भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण; शिवरायांच्या विचारांचा जागर

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : देपुळ, (वाशिम)छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त देपुळ ग्रामपंचायतीच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत परिसरात भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थितांनी शिवरायांच्या कार्याचा गौरव करत स्वराज्य स्थापनेतील त्यांच्या योगदानाला मानवंदना दिली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, दूरदृष्टी, न्यायप्रिय प्रशासन आणि लोककल्याणकारी विचारांवर प्रकाश टाकला. शिवरायांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे असून त्यांचा आदर्श प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.



देपुळ ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. प्रमोद गंगावणे यांनी उपस्थितांना शिवराज्याभिषेक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

शिवरायांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन गावाच्या विकासासाठी आणि सामाजिक एकात्मतेसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच गावातील नागरिक, युवक, महिला आणि ज्येष्ठ मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

उत्साहपूर्ण आणि शिवमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मुलगी वाचली तरच समाज घडेल : डॉ. सुधा कांकरिया"

**दैनिक युवक आधार**

**नाशिक राहुल कुलकर्णी जिल्हा प्रतिनिधी** : कन्या भ्रूणहत्या रोखणे, मुलींच्या जन्माचे स्वागत करणे आणि स्त्री-पुरुष समानतेबाबत समाजात जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने उपजिल्हा रुग्णालय निफाड, ग्रामीण रुग्णालय लासलगाव व ग्रामीण रुग्णालय पिंपळगाव बसवंत यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती निफाड येथील सभागृहात 'स्त्री जन्माचे स्वागत करा' या विषयावरील विशेष जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय नोबेल पीस अवॉर्डसाठी नामांकन प्राप्त झालेल्या 'स्त्री जन्माचे स्वागत करा' चळवळीच्या आद्यप्रवर्तक तसेच पीसीपीएनडीटी स्टेट सुपरव्हिजरी बोर्डाच्या सदस्या डॉ. सुधा कांकरिया या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्ण कल्याण समिती सदस्य मधुकर शेलार होते.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी मातेच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी उपजिल्हा रुग्णालय निफाडचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजीव तांभाळे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना मांडली. त्यानंतर डॉ. सुधा कांकरिया यांनी मुलींचे




शिक्षण, महिला सक्षमीकरण, बालविवाह प्रतिबंध, गर्भलिंग निदानावरील कायदेशीर बंदी तसेच 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाचे महत्त्व याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

समाजातील प्रत्येक घटकाने स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी सकारात्मक भूमिका बजावण्याचे आवाहन करताना त्यांनी मुलींच्या जन्माचे स्वागत करण्यासाठी ११ कलमी कृती कार्यक्रम मांडला. यामध्ये ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींच्या प्रमाणाचा अभ्यास करणे, ग्रामसभा व वार्डसभांमध्ये स्त्री जन्माच्या स्वागताचे ठराव मंजूर करणे, कन्याजन्म उत्सव साजरा करणे, केवळ मुली असलेल्या कुटुंबांचा सन्मान करणे, मुलगा-मुलगी भेदभाव दूर करणे, विवाह समारंभात 'स्त्री जन्माच्या स्वागताचा आठवा फेरा' घेण्याची संकल्पना रुजवणे, सामुदायिक डोहाळे जेवणाचे आयोजन करून कुपोषणमुक्त भारताचा संदेश देणे आदी उपक्रमांचा समावेश होता.

यावेळी सोनोग्राफी मशीन हे शाप नसून योग्य वापर झाल्यास वरदान ठरू शकते, याबाबतही सविस्तर माहिती देण्यात आली. समाजात रूढ असलेल्या 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा आणि मुलगी म्हणजे पराया धन' या चुकीच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या, आशा व अंगणवाडी पर्यवेक्षिका तसेच आरोग्य आणि शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांना माहितीपत्रकांचे वितरण करण्यात आले. मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी शासनाच्या विविध योजनांची माहितीही देण्यात आली.

या कार्यक्रमास ग्रामीण रुग्णालय लासलगावचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळकृष्ण अहिरे, ग्रामीण रुग्णालय पिंपळगाव बसवंतच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. नागनंदा मगरे, सागर कुंदे पाटील, दिलीप आबा कापसे, सुवर्णा लुक्कड, डॉ. निलेश लाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुजित कोशिरे, मेट्रन दाभाडे, इन्चार्ज सिस्टर जाधव , कनिष्ठ लिपीक दिगंबर चरापले, आरबीएसके टीमचे सदस्य, समुपदेशक नितीन परदेशी, सुनील राठोड, संदीप राऊत, अधिपरिचारिका, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्त्या तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी स्त्री भ्रूणहत्या न करण्याची आणि मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याची सामूहिक शपथ घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश भामरे यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. सुनीता डेपले यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन डॉ. सुजित कोशिरे यांनी केले.या जनजागृती कार्यक्रमामुळे समाजात मुलींबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होऊन स्त्री-पुरुष समानतेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# जातनिहाय जनगणना होईपर्यंत अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करु नये - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** - अनुसुचित जातीच्या उपवर्गीकरणाला सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिल होता. अलिकडे मात्र सर्वोच्च न्यायालयाने ज्या राज्यांना अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करावयाचे आहे, त्यांना याबाबतचा निर्णय घेण्यास मोकळीक दिलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे. उपवर्गीकरणामुळे कोणत्याही जातीवर अन्याय होवू नये हीच रिपब्लिकन पक्षाची भुमिका आहे. अनुसुचित जातीत महाराष्ट्रात 59 जाती आहेत. उपवर्गीकरणामुळे त्या जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळेल. येत्या 2027 मध्ये देशात जातनिहाय जनगणना होणार आहे. जातनिहाय जनगणनेमुळे राज्यातील अनुसुचित जातीतील प्रत्येक जातीची लोकसंख्या किती आहे याची आकडेवारी निश्चीत होईल. त्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करुन सर्व जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देवुन सर्व जातींना समान न्याय द्यावा. त्यामुळे जोपर्यंत जात जनगणना पुर्ण होत नाही, तोपर्यंत अनुसुचित जातींचे उपवर्गीकरण करु नये अशी भुमिका रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज संविधान निवासस्थानी मुंबईत पत्रकार परिषदेत मांडली. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, सुरेश बारसिंग आदि मान्यंवर उपस्थित होते. आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी राज्य सरकारने नियुक्त केलेला न्यायमुर्ती अनंत बदर समितीचा अहवाल राज्य सरकारने लागु करु नये. या समितीने अनुसुचित जातीतील सर्व जातींच्या प्रतिनीधींचा तसेच अनुसुचित जातीतील विविध जातींनी घेतलेल्या हरकती पाहता बदर समितीचा राज्य सरकारने पुनर्विचार करुन बदर समिती बरखास्त करावी. अशी महराष्ट्रातील दलितांची मागणी असल्याकडे ना. रामदास आठवले यांनी लक्ष वेधले आहे. अनुसुचित जातीच्या उपवर्गीकरणाबाबत रिपब्लिकन पक्षाची भुमिका लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे रिपब्लिकन पक्षाच्या शिष्टमंडळाद्वारे मांडण्यात येईल. अशी माहिती ना. रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

रिपब्लिकन पक्षाला राज्यपाल नियुक्त 5 विधानपरिषद सदस्यांपैकी 1 विधानपरिषद सदस्यत्व देण्यात यावे अशी आग्रही मागणी रिपब्लिकन पक्षाची आहे. भाजप शिवसेना युतीची रिपब्लिकन पक्षामुळे महायुती झाली आहे. सन 2011 पासुन रिपब्लिकन पक्ष भाजपसोबत एकजुटीने मित्रपक्ष म्हणून काम करीत आहे. भाजपने मात्र रिपब्लिकन पक्षाला शिर्डी लोकसभा मतदारसंघ दिला नाही. विधानसभेत जागा दिल्या नाहीत. मुंबई महापालिकेत जागा दिल्या नाहीत. महायुती सरकारचा उल्लेख करतांना रिपब्लिकन पक्षाचे नाव घेतले जात नाही. निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचा स्पष्ट उल्लेख केला जातो. मात्र महाराष्ट्रात राज्य सरकारमध्ये रिपब्लिकन पक्षाला सत्तेत अद्याप वाटा दिलेला नाही. मला केंद्र सरकारमध्ये तिस-यांदा मंत्रीपद दिले आहे. मात्र ज्या कार्यकर्त्यांमुळे मी केंद्रात मंत्री आहे, ज्या महाराष्ट्रातुन मी दिल्लीत पोहोचलो आहे त्या माझ्या राज्यात माझ्या कार्यकर्त्यांना सत्तेतला सहभाग मिळत नाही. नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषद निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला एकही जागा देण्यात आलेली नाही. विधानसभा आमदारांच्या मतदानातुन निवडुन येणा-या विधान परिषद सदस्यांच्या जागेत एकही जागा रिपब्लिकन पक्षाला देण्यात आली नाही. आता मात्र आगामी काळात राज्यपाल नियुक्त 5 विधान परिषद सदस्यत्वाच्या जागांची निवड होणार आहे, त्यात रिपब्लिकन पक्षाला 1 विधान परिषद सदस्यत्व दिले पाहिजे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णय घेतला पाहिजे. अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

# ऐरोलीत महापौरांच्या माध्यमातून पाणी गुणवत्ता चाचणी मोहीम



**दैनिक युवक आधार**

**अमोल कांबळे ( ऐरोली प्रतिनिधी )** : काही दिवसांपासून नवी मुंबतील गढूळ पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आज दिघा, ऐरोली व घणसोली येथील पाण्याचे नमुने घेण्यात आले होते. या संदर्भात दिघा, ऐरोली व घणसोली येथील लोकप्रतिनिधीसोबत नवी मुंबई महानगर पालिकेचे महापौर सुजाता पाटील यांनी बैठक आढावा घेण्यात आली.

ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे ही चाचणी मोहीम आयोजित केली होती. यावेळी नगरसेवकांनी गढूळ पाण्याची समस्या मांडली तसेच पाणीपुरवठा सुरळीत व्हावा व पाण्याचा वेळ वाढवावा तसेच मोरबेचे पाणी दिघे पर्यंत पोहचवने, अनधिकृत पाणी कनेक्शन, गटारातून पाणी लाइन टाकण्यास विरोध केला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी होणारा खेळ थांबविण्यासाठी प्रयत्न करावा अशी चर्चा करण्यात आली. यावेळी महापौर

सुजाता पाटील यांच्या कडून हेल्पलाइन क्रमांक : 1800 222 309 जाहीर करण्यात आला असून सर्वांनी याबाबत जनजागृती करावी. यावेळी पाण्याची टेस्ट करून त्याबाबत रिपोर्ट करण्यात आले.

याप्रसंगी अतिरिक्त शहर अभियंता पाणी पुरवठा विभाग अधिकारी अरविंद शिंदे, महेंद्र कोंडे, नगरसेविका गौरी किशोर आंग्रे, चांदणी चौगुले, ललिता घनश्याम मढवी, रेश्मा मढवी, श्रेया सुदर्शन जिरगे, अपर्ण गवते, अंजना म्हात्रे आणि नगरसेवक शिवाजी खोपडे, बंडू केनी, समाजसेवक घनश्याम मढवी उपस्थित होते.

**महापौरांची चर्चा अंधारात; विद्युत पुरवठेचा फटका**

ऐरोली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे ही महापौरांच्या माध्यमातून पाणी गुणवत्ता चाचणी मोहीम आयोजित करण्यात आली होती. परंतु शुक्रवार रात्री पासून विद्युत पुरवठा खंडित झाल्याने स्मारकामध्ये विद्युत पुरवठा ठप्प होता. येथील जनरेटर सुद्धा जळाल्याने अत्यंत महत्त्वाची चर्चा ही गैरसोयीमुळे अंधारातच घेण्याची नौबत महापौरांवर आली.

# ओरायन मॉलच्या यशस्वी १० व वर्धापन दीना निमित्त आयोजित "लाभले आम्हास भाग्य" कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल येथील ओरायन मॉलच्या यशस्वी १० वर्षांच्या प्रवासानिमित्त आनंद सोहळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. गेल्या दशकभराचा हा प्रवास आव्हानात्मक आणि बरेच काही शिकवणारा ठरला असला, तरी ग्राहकांच्या, नागरिकांच्या आणि सुहृदांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मॉलने ही यशस्वी वाटचाल पूर्ण केल्याची भावना व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली. या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या दिमाखदार सोहळ्याला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाबाळासाहेब पाटील, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून ओरायन मॉल परिवाराला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या बरवा मनोरंजन मंडळी प्रस्तुत "लाभले आम्हास भाग्य" या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या सादरीकरणात सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे, मृण्मयी देशपांडे, गौतमी देशपांडे आणि संगीतकार अजित परब या महाराष्ट्राच्या लाडक्या कलाकारांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने रंगत आणली. या कार्यक्रमावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिलीप करेलिया, मनन परुळेकर यांच्यासह पनवेलकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिल्लोडमध्ये 'रंग राधिका आर्ट स्टुडिओ'चे कला प्रदर्शन

## नवोदित कलाकारांना मिळाले व्यासपीठ; दिग्गजांचे मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड शहरातील युवा कलाकार आचल गोपालसिंग धनावत यांच्या "रंग राधिका आर्ट स्टुडिओ" तर्फे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय कला प्रदर्शनास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रदर्शनात स्टुडिओतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध कलाकृतींचे प्रदर्शन करण्यात आले असून, नवोदित कलाकारांच्या प्रतिभेला एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

विशेष म्हणजे या प्रदर्शनाला महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार तथा प्राथमिक शिक्षक गजेंद्र आवारे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले. जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले आवारे हे कॅनव्हासवरील भव्य आणि



अत्यंत तपशीलवार तैलचित्रांसाठी देश-विदेशात ओळखले जातात. त्यांनी प्रदर्शनातील विविध चित्रकृतींची पाहणी करून विद्यार्थ्यांना चित्रकलेतील बारकावे, रंगसंगती, रेखाटनातील अचूकता आणि कलाक्षेत्रातील भविष्यातील संधी याविषयी सखोल मार्गदर्शन केले.

यावेळी प्रसिद्ध लेखक, कवी आणि कलाकार साईनाथ फुसे यांनीही प्रदर्शनास भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत कला ही केवळ छंद नसून व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. कलाकारांनी समाजातील वास्तव, संस्कृती आणि संवेदना आपल्या कलाकृतींमधून व्यक्त कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

प्रदर्शनामध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे आणि कौशल्याचे दर्शन घडवणाऱ्या अनेक आकर्षक कलाकृती सादर केल्या. या प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली असून कला क्षेत्राबाबत समाजात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आचल धनावत यांच्या उपक्रमाचे कौतुक करत सिल्लोडसारख्या शहरात कला संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या. तसेच भविष्यात अशा उपक्रमांतून अधिकाधिक विद्यार्थ्यांना संधी मिळावी, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

सिल्लोड शहरात प्रथमच इतक्या व्यापक स्वरूपात आयोजित करण्यात आलेल्या या कला प्रदर्शनाने कला रसिकांचे लक्ष वेधून घेतले असून नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

**'रंग राधिका आर्ट स्टुडिओ'चा प्रवास**

**आचल धनावत यांनी अल्पवयातच कला क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. दहावीनंतर छत्रपती संभाजीनगर येथील कला मार्गदर्शक दीपक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी सिल्लोड येथे "रंग राधिका आर्ट स्टुडिओ" ची स्थापना केली. या स्टुडिओमध्ये चारकोल पोर्ट्रेट, ड्राफ्टिंग पेन्सिल आर्ट, ॲक्रेलिक पेंटिंग, ऑइल पेंटिंग यांसह विविध कलाप्रकारांचे प्रशिक्षण दिले जाते.**

# बनावट ब्रँड स्टिकर लावून वजनकाट्यांची विक्री; 200 हून अधिक मशीन जप्त

## ब्रह्मपुरीतील आशिष पारधी आणि सुरज पारधी दोघांविरुद्ध चौकशी सुरू

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : सतीश कडू** : चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी तालुक्यात बनावट ब्रँड स्टिकर लावून तसेच बनावट बिलबुकांच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी साई वेइंग स्केल, एस ए सर्विसेस, एस ए आय वेइंग सर्विसेस याच्या प्रो. आशिष मधुकर पारधी व सुरज मधुकर पारधी (रा. उदापूर, ता. ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर) यांच्यासह इतर काही वजन-मापे व्यवसायिकांविरुद्ध तक्रारी दाखल करण्यात आल्या असून पोलीस व वैधमापन शास्त्र विभागामार्फत तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधितांनी संगनमत करून शार्प इन्स्ट्रुमेंट्स या कंपनीच्या नावाने बनावट बिलबुक छापल्याचा तसेच श्री साई स्केल कंपनी यांच्या मालकीच्या TM SANSUI या ब्रँडचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. नॉन-स्टँडर्ड व फॅब्रिकेटेड वजनकाट्यांवर नामांकित ब्रँडचे बनावट स्टिकर लावून बाजारात विक्री केल्याची बाब तक्रारीत नमूद करण्यात आली आहे.

या संदर्भात ब्रह्मपुरी पोलीस स्टेशन तसेच वैधमापन शास्त्र विभाग, चंद्रपूर-गडचिरोली यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांच्या पथकासह वैधमापन शास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित आस्थापनांवर संयुक्त कारवाई केली. तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात नॉन-स्टँडर्ड व नियमबाह्य वजनकाटे आढळून आल्याने अंदाजे 200 हून अधिक मशीन जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

प्राथमिक चौकशीत वैधमापन शास्त्र अधिनियम, 2009 मधील विविध तरतुदींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्याने अधिक सखोल तपास सुरू करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून तसेच वैधमापन शास्त्र विभागाकडून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, शार्प इन्स्ट्रुमेंट्स व श्री साई स्केल कंपनी यांच्या वतीने ग्राहकांना आवाहन करण्यात आले आहे की, कोणतेही वजनकाटे अथवा वजन-मापे खरेदी करताना त्यावर वैध पडताळणी प्रमाणपत्र, स्टॅम्पिंग प्लेट, अधिकृत सील आणि नियमानुसारची कागदपत्रे असल्याची खात्री करावी. तसेच अधिकृत वितरकांकडूनच ब्रँडेड व प्रमाणित उत्पादने खरेदी करून फसवणुकीपासून सावध राहावे.

सदर प्रकरणामुळे वजन-मापे क्षेत्रातील नियमबाह्य व्यवहारांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून तपास पूर्ण झाल्यानंतर आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयात रेल्वे प्रवासी सुरक्षा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षिततेसंदर्भात विविध समस्या, उपाययोजना व प्रवासी हिताच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयात आज रेल्वे प्रवासी सुरक्षा बैठक अत्यंत गंभीर व सकारात्मक वातावरणात पार पडली. मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त एम. राकेश कलासागर तसेच पोलीस उपायुक्त प्रज्ञा जेडगे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आयुक्तालयातील मंथन सभागृहात ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

बैठकीत रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेचे प्रश्न, महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना, रेल्वे स्थानक परिसरातील गुन्हेगारी रोखणे, फेरीवाल्यांशी संबंधित समस्या, रेल्वे परिसरातील स्वच्छता, गर्दी नियंत्रण तसेच रेल्वे प्रशासन व प्रवासी संघटनांमधील समन्वय या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ (MRPM) चे अध्यक्ष, फळ, फुल, भाजीपाला विक्रेते व फेरीवाले श्रमिक संघटनेचे (PPBVFSS) अध्यक्ष तसेच रेल्वे मंत्रालयाच्या सेंट्रल रेल्वे सल्लागार समितीचे (ZRUCC) सदस्य मा. अभिजीत धुरत यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या आणि मागण्या पोलीस प्रशासनासमोर मांडल्या. तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे पोलीस प्रशासनाने अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज व्यक्त केली.

बैठकीत महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे अरुण पराडकर, रेणुका साळुंखे, मीनल पवार, रुपाली पराडकर, सुरेंद्र नेमळेकर, पी. आर. तांबे, विलास खैरे, गणेश परब, सचिन नागवेकर, सुनील करपे, ओसामा खान, महमद हुसेन गुरव, सचिन धाडवे, प्रशांत महाडिक, दीपक परब, मोहन कांगणे, संदीप जोईल, विनायक शिर्के,सत्यवान टावरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व रेल्वे प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रवासी संघटना व रेल्वे पोलीस प्रशासन यांच्यात अधिक समन्वय ठेवून संयुक्तपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच प्रवाशांच्या तक्रारींचे त्वरित निराकरण करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले.

# पालकमंत्री पंकज भोयर यांच्या उपस्थितीत वर्ध्यात शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाची प्रेरणा जागवत वर्धा येथे शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यास जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीत शिवरायांच्या पराक्रम, स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीच्या विचारांचा जागर करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कौशल्य सादरीकरणे आणि प्रेरणादायी कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शिवचरित्रातील ऐतिहासिक



प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण करत विद्यार्थ्यांनी शिवरायांचे शौर्य, राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, दूरदृष्टी आणि आदर्श नेतृत्वाचे दर्शन घडविले.

सांस्कृतिक कार्यक्रमांमधून स्वराज्य स्थापनेसाठी शिवरायांनी दिलेला संघर्ष, जनतेप्रती असलेली बांधिलकी आणि न्यायनिष्ठ राज्यकारभाराची तत्त्वे प्रभावीपणे मांडण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अभिनय, नृत्य आणि गीत सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याच्या विचारांचा जागर करत राष्ट्रप्रेम, सुशासन, जनकल्याण आणि समाजहिताच्या मूल्यांचा संदेश देण्यात आला. शिवरायांचे विचार आणि त्यांचे कर्तृत्व आजही प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. तसेच त्यांच्या आदर्शांचे अनुसरण करून समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

पालकमंत्री पंकज भोयर यांनी आपल्या मनोगतात शिवरायांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत युवा पिढीने त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्रसेवा, सामाजिक बांधिलकी आणि चारित्र्यसंपन्न जीवनाचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी "जय भवानी... जय शिवाजी!"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित या सोहळ्याने उपस्थितांच्या मनात शिवप्रेरणा, राष्ट्रभक्ती आणि स्वाभिमानाची नवचेतना जागवली.

# आदेश कागदावरच, न्याय अधांतरी! वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

## महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे हिंगणघाट** - तालुक्यातील छोटी आर्वी येथे शेतबांध व पाण्याच्या निचऱ्याच्या वादाने अखेर एक दुःखद वळण घेतले आहे. तब्बल दीड वर्षांपासून न्यायासाठी संघर्ष करणारे ७५ वर्षीय शेतकरी लक्ष्मीकांत मारोतराव दुर्गे यांचे निधन झाल्यानंतर महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. आदेश निघाले, सुनावण्या झाल्या, पत्रव्यवहार झाला; मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी न झाल्याचा आरोप पीडित कुटुंबाने केला आहे.

**वादापासून मृत्यूपर्यंतचा संघर्ष**

छोटी आर्वी येथील लक्ष्मीकांत दुर्गे आणि शेजारील शेतकरी यांच्यात शेतातील पाण्याच्या निचऱ्यावरून वाद निर्माण झाला होता. प्रकरण महसूल विभागापर्यंत पोहोचल्यानंतर सुनावण्या घेण्यात आल्या आणि संबंधितांना पाण्याचा योग्य निचरा करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्यानंतर मामलेदार अधिनियम १९०६ अंतर्गत आदेशही पारित करण्यात आला. मात्र, कुटुंबीयांच्या मते आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही. नाली खोदण्याऐवजी केवळ जमीन सपाट करण्यात आल्याने पावसाचे पाणी दुर्गे यांच्या शेताकडे वळत राहिले आणि वाद अधिकच चिघळला. न्यायासाठी धावपळ, वाढता मानसिक ताण, वारंवार अर्ज, तक्रारी, महसूल कार्यालयाचे उंबरठे आणि सुनावण्या यामुळे वृद्ध शेतकरी मानसिकदृष्ट्या खचत गेले. "न्याय मिळेल" या आशेवर त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला, मात्र प्रत्यक्षात परिस्थिती बदलली नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या सततच्या मानसिक तणावाच्या पार्श्वभूमीवर २० जुलै २०२५ रोजी लक्ष्मीकांत दुर्गे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

**मृत्यूनंतरही न्यायासाठी लढा सुरूच**

वडिलांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र सारंग लक्ष्मीकांत दुर्गे यांनी पुन्हा प्रशासनाकडे धाव घेतली.

त्यानंतर २६ फेब्रुवारी २०२६ रोजी तहसील कार्यालयाने मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना स्थळ पाहणी करून आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले.

यामुळे एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे जर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी वेळेत झाली असती,

तर हा संघर्ष आणि त्यातून निर्माण झालेली शोकांतिका टाळता आली असती का?

**पावसाळ्यापूर्वी कारवाईची मागणी**

सारंग दुर्गे यांनी २० मे २०२६ रोजी तहसीलदारांकडे नव्याने अर्ज दाखल करत आदेशांचे पालन अद्याप झाले नसल्याचा आरोप केला

# उन्हाळ्याची सुट्टी पर्यावरणाशी गट्टी; साकोलीत २४ वे १० दिवसीय पक्षी व निसर्ग अभ्यास शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि निसर्गप्रेमाची बीजे विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणाऱ्या "उन्हाळ्याची सुट्टी पर्यावरणाशी गट्टी" या अभिनव उपक्रमांतर्गत साकोली येथे २४ वे १० दिवसीय निःशुल्क पक्षी व निसर्ग अभ्यास शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले. मागील २६ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेला हा उपक्रम विदर्भातील पर्यावरण शिक्षणाचा आदर्श ठरत आहे.

कृष्णमुरारी कटकवार हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज साकोली येथील पर्यावरण सेवा योजना, इको क्लब फॉर लाईफ मिशन, राष्ट्रीय हरित सेना आणि जयंत कटकवार ग्लोबल नेचर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रीनफ्रेंड्स नेचर क्लब व नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था साकोली यांनी विशेष सहकार्य केले. प्रा. अशोक गायधने यांच्या मार्गदर्शनाखाली दहा दिवस विविध तलाव, जैवविविधता उद्यान, नर्सरी परिसर, गडकुंभली पहाडी, कृषी विज्ञान केंद्र धर्मापुरी तसेच नवेगावबांध येथे पक्षी निरीक्षण, निसर्गभ्रमंती आणि साहसी ट्रेकिंगचे आयोजन करण्यात आले. रात्रीच्या सत्रात ग्रह, नक्षत्रे, तारे व खगोलशास्त्राची माहिती देऊन प्रत्यक्ष




निरीक्षण घडविण्यात आले.

**५० हून अधिक पक्षी, २० पेक्षा अधिक फुलपाखरांची ओळख**

शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी दुर्बिणीद्वारे ५० हून अधिक पक्षी, २० पेक्षा अधिक फुलपाखरे, विविध सरपटणारे प्राणी, साप, चतुर, कोळी तसेच वन्यजीवांचे निरीक्षण केले. पक्ष्यांची मराठी-इंग्रजी नावे, नर-मादीतील फरक आणि त्यांचे पर्यावरणीय महत्त्व याबाबत सखोल माहिती देण्यात आली. याशिवाय पक्षी चित्रकला, पक्षी घरटे निर्मिती, पक्षी पाणपोई, फिडर बॉटल तयार करणे तसेच निसर्ग शिबिर अहवाल लेखन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शिबिरार्थींना बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**विज्ञानाबद्दल जिज्ञासा वाढली**

शिबिरार्थींनी मनोगत व्यक्त करताना, "या शिबिरामुळे केवळ निसर्गज्ञान वाढले नाही तर विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, निरीक्षण क्षमता आणि चिकित्सक वृत्तीही विकसित झाली," असे सांगितले.

समारोप कार्यक्रम नवेगावबांध येथे पार पडला. यावेळी शिक्षिका पुष्पा बोरकर यांच्या हस्ते सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

**महाराष्ट्रातील अनोखा उपक्रम**

"सलग २६ वर्षे केवळ पक्षी आणि निसर्ग संवर्धनासाठी प्रखर उन्हात निःशुल्क १० दिवसीय शिबिर आयोजित करणारा हा महाराष्ट्रातील एकमेव उपक्रम असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी तरुण पिढी घडविण्याचे हे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे," असे प्रा. अशोक गायधने यांनी सांगितले. शिबिराच्या यशस्वितेसाठी प्राचार्या मनिषा काशिवार, विज्ञान शिक्षक बी. एस. लंजे, शिक्षिका पुष्पा बोरकर, अंजना रणदिवे, युवराज बोबडे, रोशन बागडे, पूर्वा बहेकार तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि शेकडो निसर्गप्रेमींनी विशेष परिश्रम घेतले.

"निसर्गाशी मैत्री, पर्यावरणाशी नाळ आणि विज्ञानाशी जिज्ञासा" हेच या शिबिराचे खरे यश ठरले.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे द्वितीय वर्धापन दिन उत्साहात साजरे

**दैनिक युवक आधार:**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/सय्यद इसा** : निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे दुसरे वर्धापन दिन जगदंबा सभागृह माहूर येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये द्वितीय वर्धापन दिनानिमित्त पत्रकारांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सन्मान पुरस्कार सोहळा पार पाडण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गणेश कचकलवार होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून श्री किरण कुमार भोंडवे उपविभागीय पोलीस अधिकारी माहूर यांची उपस्थिती होती तर विशेष उपस्थिती म्हणून दभप श्री साईनाथ महाराज वसमतकर आनंद दत्तधाम मठाधिपती तथा महाराष्ट्र राज्याचे स्वच्छता दूत तथा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र राज्य प्रमुख मार्गदर्शक ह्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. तर माहूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे, माहूर नगरीचे नगरसेवक गोपू महामुने, सामाजिक कार्यकर्ता मनोज कीर्तने, भाग्यवान भवरे, निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचे नांदेड जिल्हाध्यक्ष संभाजी सूर्यवंशी, मनीषाताई टाकसाळ अमरावती, यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन करून महापुरुषांना वंदन करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट पत्रकार, सामाजिक क्षेत्र, क्रीडा, शिक्षण, रास्त भाव दुकानदार संघाचे अध्यक्ष, कायदेविषयक, स्वच्छता, संगणक क्षेत्र अशा विविध पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते





देऊन त्यांचा शाल श्रीफळ व सत्कार करण्यात आला, प्रमुख पाहुण्यांचे मनोगत व्यक्त झाले या कार्यक्रमाला महिलां पत्रकारांची देखील विशेष उपस्थिती होती या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सर्व पत्रकार बांधवांनी अतिशय परिश्रम घेतले सुरेख असे सूत्रसंचालन प्रा.विनोद कांबळे सर व सय्यद इसा सर यांनी केले.

# आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे विद्यार्थी भविष्यासाठी तैय्यार

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : गेल्या महिन्याभरापासून आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग अकॅडमी लाखनी येथे समर ट्रेनिंग 2.0 नावाने चालत असलेल्या उन्हाळी शिबिराचं शेवटचा टप्पा म्हणजे टेक्नॉलॉजी चा टप्पा. तांत्रिकदृष्ट्या वाढत असलेल्या जगाचा आढावा घेत तसेच येणारा भविष्यातील नोकऱ्या आणि विद्यार्थ्यांचे घडणारे भविष्य या सर्व गोष्टींना लक्षात ठेवून आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग चे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे शिक्षण देण्याचे ठरवले आणि त्यांच्या या ध्येयाला गुरुशिष्य मल्टी स्किल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे तसेच किवानो टेक्नॉलॉजी कंपनीचे मालक श्री स्वप्निलजी वनकर सर यांनी साथ देऊन त्यांचं संपूर्ण ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याचा निश्चय केला. या दोन्ही प्रशिक्षकांच्या सहयोगातून उदयास आली ती म्हणजे यावर्षीच्या उन्हाळी शिबिरांमधील आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि आयोटी रोबोटिक्स तसेच सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि कोडींग चे हे प्रशिक्षण. या शिबिरांमधील पहिल्या दिवसांमध्ये श्रीवणकर सरांनी विद्यार्थ्यांना टेक्नॉलॉजी आणि आपलं जीवन हे दोन्ही एकमेकांशी





कसे संबंधित आहेत याविषयी सखोल माहिती दिली. दुसऱ्या दिवशी आर्टिफिशियल इंटेलिजन्स नेमकं काय असते सोबतच तो कसा काम करतो आणि त्याचं उपयोग करून आपण कसा आपलं करिअर घडवू शकतो याविषयी संपूर्ण माहिती दिली. तिसऱ्या दिवशी सरांनी शिकवले की कुठल्याही वेबसाईटला आपण कसं तयार करू शकतो त्या वेबसाईटला लागणारे डोमेन आपण कसे खरेदी करू शकतो सोबतच ते वेबसाईट कशी डिझाईन होते आणि कशा पद्धतीने त्याच्या त्याची कोडींग होते त्याच्या मागचं काय सॉफ्टवेअर असतो आणि सोबतच त्याला लाइफ करण्यासाठी कोणत्या टप्प्यांमधून जावं लागते याविषयीचे संपूर्ण माहिती देत प्रत्येक विद्यार्थ्यांनी आर्टस ऑफ लाइफ कोचिंग च्या एक बेसिक डेमो म्हणून खूप सुंदर सहसा वेबसाईट बनवला. असा प्रशिक्षणांमधून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या गोष्टी जेव्हा शिकायला मिळतात तेव्हा विद्यार्थ्यांना त्यांचं शैक्षणिक जो ज्ञान असतो त्या ज्ञानाचा उपयोग भविष्यासाठी सोबतच आपल्या करिअर घडवण्यासाठी करण्याची मदत मिळते यामधून प्रत्येक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि हाच आत्मविश्वास नेमका प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्याचा जो स्वप्न आहे तो आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंगच्या संचालक श्री निहाल वालदे सरांचा आहे. आर्टस ऑफ लाइफ कोचिंग ला लाभलेले सर्व प्रशिक्षकांनी हे सिद्ध करून दाखवले की जर सर्व शिक्षकांचा आणि प्रशिक्षकांचे ध्येय जर एक असलं तर समाज नक्कीच मोठ्या स्तरावर वाढू शकतो. श्री स्वप्निल जी वनकर सरांनी त्यांच्या अति व्यस्त कामकाजातून वेळ काढून लाखणे तालुक्यामधल्या विद्यार्थ्यांना गोरगरिबांच्या मुलांना हे प्रशिक्षण देण्यासाठी लाखनीला आले त्यासाठी आर्टस ऑफ लाइफ कोचिंगचे संचालक श्री निहाल वालदे सर यांनी त्यांचे आभार मानले आणि असेच सातत्याने लाखनी तालुक्यातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याकरिता श्री स्वप्निल जी वनकर सर नेहमी कार्यरत राहतील असे आश्वासन वनकर सरांनी दिले. खरच बघायला गेलं तर आर्टस ऑफ लाईफ कोचिंग ही नव्याने उद्यास आलेली एक मात्र कोचिंग आहे जिथे शालेय शिक्षणासोबतच इतर अति आवश्यक कौशल्यांवर पण भर दिला जात आहे लाखनी तालुक्यातील प्रत्येक विद्यार्थ्याने आणि सोबतच प्रत्येक पालकाने या अकॅडमीच्या लाभ नक्की घ्यावा. विद्यार्थ्यांचं उत्स्फूर्त, आनंद आणि आत्मविश्वास बघून श्री स्वप्निलजी बनकर यांनी या सर्व विद्यार्थ्यांना पुढील तीन महिने सातत्याने उच्चस्तरीय प्रशिक्षण देण्याच्या ठरवला आहे आणि तसे त्यांनी आश्वासन पण दिलेले आहे यासाठी निहाल वाद्य सरांनी वनकर सरांचं आभार मानलं. पुढील वाटचालीसाठी आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग अकॅडमी लाखनी ला शुभेच्छा.

# पॉलिहाऊसमध्ये बिबट मादीचा थरार; वनविभागाच्या शिताफीने टळला अनर्थ

**दैनिक युवक आधार**

**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यातील खडकमाळेगाव येथे शुक्रवारी (दि. ५) एका पॉलिहाऊसमध्ये बिबट मादी शिरल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र वनविभाग आणि निफाड बचाव पथकाने दाखविलेल्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळला असून बिबट मादीचे यशस्वीरीत्या रेस्क्यू करण्यात आले.

खडकमाळेगाव येथील राहुल खंडेराव शिंदे यांच्या मालकीच्या गट क्रमांक ७१९/१ मधील



पॉलिहाऊसमध्ये बिबट वन्यप्राणी शिरल्याची माहिती वनविभागाला मिळताच अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपरिमंडळ अधिकारी जयप्रकाश शिरसाठ आणि वनरक्षक विजय दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड बचाव पथकाने तात्काळ मोहीम हाती घेतली.ज्ञानेश्वर पवार, सादिक शेख, वैभव दौंड, विजय माळी, काशिनाथ माळी, शरद चांदोरे, सागर दुसिंग आणि भारत माळी यांनी अत्यंत संयमाने आणि शिताफीने बचावकार्य राबविले. पॉलिहाऊसच्या एका बाजूस पिंजरा लावून अंदाजे दीड ते दोन वर्षे वयाच्या बिबट मादीला सुरक्षितरीत्या जेरबंद करण्यात आले.रेस्क्यू करण्यात आलेल्या बिबट मादीला शासकीय वाहनातून निफाड वनउद्यानात हलविण्यात आले असून तिच्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असल्याची माहिती वनविभागाने दिली. वनविभाग आणि बचाव पथकाच्या तत्परतेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# लिहाखेडी येथील 'कै. कडुबा पाटील साखळे स्मृती ग्रंथालयात' शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथील 'कै. कडुबा पाटील साखळे स्मृती ग्रंथालया'च्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र




अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवराम साखळे, सचिव अशोक साखळे, कार्याध्यक्ष बाळाराम साखळे उपस्थित होते. तसेच, प्रमुख उपस्थितीत दिलीप साखळे, नामदेवराव साखळे, उत्तम बाबा साखळे, हरिदास साखळे, संभाजी साखळे, विनोद चव्हाण, गणेश बावस्कर, सिताराम साखळे, दामू आप्पा साखळे, विष्णू फरकाडे, गोविंदा साखळे, सयाजी गोरे, कौतिक साखळे, विश्वास साखळे, शंकर सरोदे, सपकाळ सर, देविदास साखळे, श्रीमती ललिता नंदकिशोर साखळे, चंद्रभान साखळे, विशाल साखळे आदी मान्यवरांसह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमातून शिवरायांच्या विचारांचा प्रसार करून ग्रंथालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती जोपासण्याचा संकल्प करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# श्रीवर्धन शहरात पायाभूत सुविधांचा अभाव; आश्वासनांचा विसर पडला का?

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : नगराध्यक्ष आणि नगरसेवकांनी निवडणुकीपूर्वी श्रीवर्धन शहरातील पायाभूत सुविधा सुधारण्याचे आश्वासन देत नागरिकांचा विश्वास संपादन केला होता. एक अभ्यासू, सुशिक्षित व्यक्तिमत्त्व म्हणून नागरिकांनी आपल्याला श्रीवर्धनचे प्रथम नागरिक म्हणून पसंती दिली. मात्र निवडणुकीनंतर तब्बल सहा महिने उलटूनही शहरातील अनेक मूलभूत प्रश्न कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढू लागली आहे.शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न, रस्त्यांची दुरवस्था, ठिकठिकाणी पडलेले खड्डे, स्वच्छतेच्या समस्या तसेच स्मशानभूमीतील अपुऱ्या सुविधा यांसारखे प्रश्न आजही जैसे थे असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः श्रीवर्धन परिसरातील स्मशानभूमीत शेड, प्रकाश व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने स्थानिक नागरिक वारंवार मागणी करत आहेत. पावसाळा तोंडावर असतानाही या प्रश्नांवर ठोस कार्यवाही होताना दिसत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

नागरिकांच्या मनात आता एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे की, अभ्यासू आणि सक्षम नेतृत्व म्हणून ज्यांच्यावर विश्वास ठेवला, त्यांच्याकडून अद्याप कोणतेही ठोस निर्णय किंवा प्रभावी उपाययोजना का होत नाहीत? शहरातील मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेली गती प्रशासनात का दिसत नाही? अशा चर्चा आता सर्वसामान्यांमध्ये सुरू आहेत.निवडणुकीच्या काळात विकासाची आश्वासने देण्यात आली होती. मात्र सहा महिन्यांनंतरही परिस्थितीत अपेक्षित बदल न झाल्याने नागरिक आता प्रशासनाला जाब विचारू लागले आहेत. "पाणी, रस्ते, स्वच्छता आणि स्मशानभूमीतील सुविधा यांसारखे मूलभूत प्रश्न सुटणार तरी कधी?" असा थेट सवाल सामान्य जनता करत आहे.श्रीवर्धनच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ आश्वासने नव्हे तर प्रत्यक्ष कृती आणि परिणाम अपेक्षित असल्याचे नागरिकांचे म्हणणे असून, येत्या काळात नगरपालिकेकडून कोणती ठोस पावले उचलली जातात याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे पर्यावरण दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड तालुका प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर** : श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड तसेच सामाजिक वनीकरण विभाग रिसोड यांच्या संयुक्त विद्यामाने 5 जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरण दिनाचा उद्देश आणि महत्व याविषयी माहिती देण्यात आली.तसेच वृक्षारोपणासाठी रोपटे भेट देण्यातआले. व शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख व उपप्राचार्य श्री संजय नरवाडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक वनीकरण विभाग रिसोडच्या डिघोळे मॅडम , त्यांचे सहकारी, तसेच पर्यावरण शिक्षक श्री विठ्ठलराव सरनाईक,



एन.सी.सी.सी.टी. ओ. प्रा.अभिजीत देशमुख,क्रीडा शिक्षिका श्रीमती शिवकन्या गाडेकर, शिक्षिका सपना सरनाईक शाळेतील कर्मचारी वैशाली वाकोडे एन.सी.सी.चे विद्यार्थी तसेच विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड तसेच सामाजिक वनीकरण विभाग रिसोड यांच्या संयुक्त विद्यामाने 5 जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांना पर्यावरण दिनाचा उद्देश आणि महत्व याविषयी माहिती देण्यात आली.तसेच वृक्षारोपणासाठी रोपटे भेट देण्यातआले. व शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख व उपप्राचार्य श्री संजय नरवाडे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक वनीकरण विभाग रिसोडच्या डिघोळे मॅडम , त्यांचे सहकारी, तसेच पर्यावरण शिक्षक श्री विठ्ठलराव सरनाईक, एन.सी.सी.सी.टी. ओ. प्रा.अभिजीत देशमुख,क्रीडा शिक्षिका श्रीमती शिवकन्या गाडेकर, शिक्षिका सपना सरनाईक शाळेतील कर्मचारी वैशाली वाकोडे एन.सी.सी.चे विद्यार्थी तसेच विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# आयआयटी मुंबईच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत निफाडच्या विशेष शिक्षिकेचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शीघ्र हस्तक्षेप व प्रारंभिक निदान विषयावरील संशोधन सादर करून नाशिक जिल्हा परिषदेच्या विशेष शिक्षिका विजया अवचार यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. जानेवारी २०२६ मध्ये आयआयटी मुंबई येथे झालेल्या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांच्या संशोधनाला विशेष दाद मिळाली.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या प्रारंभिक निदान, शीघ्र हस्तक्षेप आणि गुणवत्तापूर्ण समावेशित शिक्षण या विषयावर आयोजित परिषदेत भारतासह २२ देशांतील सुमारे ५५० संशोधक, तज्ज्ञ व शिक्षण अभ्यासक सहभागी झाले होते. यामधून निवडलेल्या ५० संशोधन सादरीकरणांमध्ये विजया अवचार यांचा समावेश होता.

समग्र शिक्षा, जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या आधारे त्यांनी “० ते ६ वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शीघ्र हस्तक्षेप व निदान प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका” या विषयावर संशोधन अहवाल व पोस्टर सादर केले. प्रारंभिक स्तरावर योग्य निदान व वेळेवर हस्तक्षेप केल्यास दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, सामाजिक, भाषिक व शैक्षणिक विकासाला चालना मिळते, असा निष्कर्ष त्यांनी मांडला.

महाराष्ट्राचे दिव्यांग कल्याण सचिव तुकाराम मुंढे यांच्या उपस्थितीत हे सादरीकरण झाले. त्यांनी नाशिक जिल्ह्यातील समावेशित शिक्षण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. महाराष्ट्रातून समग्र शिक्षाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जिल्हा परिषद नाशिकच्या विजया अवचार या एकमेव प्रतिनिधी ठरल्या.

या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांनी त्यांचे अभिनंदन केले. परिषदेत त्यांना प्रकाशित संशोधन पुस्तक, प्रमाणपत्र व अभिनंदनपत्र देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संशोधनाधारित समावेशित शिक्षणाचा हा प्रयत्न भविष्यातील शैक्षणिक धोरणांसाठी दिशादर्शक ठरेल,

अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# आकांक्षीत तालुक्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'मिशन मोड'चा मंत्र; आरोग्य, पोषण व शिक्षण निर्देशांक सुधारण्यासाठी सीईओ सत्यम गांधी यांचे कडक निर्देश

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** केंद्र शासनाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील तालुक्यांच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (भाप्रसे) यांनी सर्व विभागांना मिशन मोडमध्ये काम करण्याचे निर्देश दिले आहेत. आरोग्य, पोषण, शिक्षण आणि मूलभूत सुविधांशी संबंधित निर्देशांकांमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार करून प्रभावी अंमलबजावणी करण्यावर त्यांनी भर दिला.

जिल्हा परिषदेत आयोजित आकांक्षीत तालुका कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, पंचायत राज आणि इतर संबंधित विभागांना ठोस उद्दिष्टे देण्यात आली.

**आरोग्य विभागाला सहा महिन्यांत उद्दिष्टपूर्तीचे आव्हान**

आरोग्य विभागाच्या आढाव्यात गर्भवती महिलांची पहिल्या महिन्यातील नोंदणी वाढविणे, संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण शंभर टक्क्यांपर्यंत नेणे आणि कमी वजनाच्या (२,५०० ग्रॅमपेक्षा कमी) नवजात बालकांचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले. या सर्व उद्दिष्टांच्या शंभर टक्के पूर्ततेसाठी सहा महिन्यांची मुदत निश्चित करण्यात आली असून त्यासाठी आरोग्य यंत्रणेने गावपातळीपर्यंत प्रभावी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



**कुपोषणमुक्तीसाठी विशेष मोहीम**

पोषण विभागाच्या आढाव्यात तीव्र कुपोषित (SAM) आणि मध्यम कुपोषित (MAM) बालकांची संख्या कमी करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. यासोबतच अंगणवाडी केंद्रांमध्ये शौचालय, स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आदेश देण्यात आले.

**गुणवत्तापूर्ण शिक्षणावर विशेष भर**

शिक्षण विभागाला विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित शिक्षकांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता निर्देशांकात वाढ करण्यासाठी आणि ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करण्यावर भर देण्यात आला.

**भारत नेट कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यावर भर**

बैठकीत ग्रामीण भागातील डिजिटल सेवांचा विस्तार आणि शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी भारत नेट कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. विविध विभागांनी परस्पर समन्वयातून काम करून आकांक्षीत तालुक्यांमधील विकासकामांना अधिक वेग देण्याची गरज असल्याचे सीईओंनी स्पष्ट केले.

**पाच नव्या तालुक्यांचा कार्यक्रमात समावेश**

केंद्र शासनाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमात जिल्ह्यातील भातकुली, नांदगाव खंडेश्वर, चांदूर बाजार, चांदूर रेल्वे आणि धामणगाव रेल्वे या पाच तालुक्यांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. या सर्व तालुक्यांनी तातडीने आपला बेसलाइन डेटा तयार करून विकासाचा कृती आराखडा सादर करावा, असे स्पष्ट निर्देश बैठकीत देण्यात आले.

या बैठकीस सर्व विभाग प्रमुख, आकांक्षीत तालुका फेलो अतुल खडसे व संजय इंगळे प्रत्यक्ष उपस्थित होते, तर सर्व गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

**सीईओ सत्यम गांधी यांचे स्पष्ट निर्देश**

"आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण आणि शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक निर्देशांकात गुणात्मक सुधारणा दिसणे आवश्यक आहे.

यासाठी सर्व विभागांनी उद्दिष्टपूर्तीकडे लक्ष केंद्रित करून वेळबद्ध आणि परिणामकारक अंमलबजावणी करावी. विकासाचे परिणाम प्रत्यक्ष नागरिकांपर्यंत पोहोचले पाहिजेत," असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी (भाप्रसे) यांनी केले.

# मोरेगाव येथे शिवराज्यभिषेक सोहळा उत्साहात संपन्न

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दूध-दह्याचा अभिषेक ; ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित

**दैनिक युवक आधार**

**मोरेगाव विशेष प्रतिनिधी, तुकाराम नाटकर :** येथील ग्रामस्थांच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्यभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला. या मंगलमयी दिनाचे औचित्य साधून गावात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे आणि पुतळ्याचे पूजन करून त्यांना दूध आणि दह्याने पारंपरिक पद्धतीने राज्याभिषेक करण्यात आला. या अभिषेकानंतर उपस्थितांनी शिवरायांच्या जयघोषाने परिसर दणाणून सोडला होता.

**मान्यवरांचे विचार व मनोगत**

या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना ग्रामविकास अधिकारी रविकुमार डोंबे सर म्हणाले की,



"शिवराज्यभिषेक हा केवळ एका राजाचा राज्यारोहण सोहळा नव्हता, तर ते रयतेचे राज्य स्थापन झाल्याचे अधिकृत प्रतीक होते. शिवरायांचे विचार आजही आपल्याला प्रशासकीय व सामाजिक कार्यात मार्गदर्शक ठरतात."

सामाजिक कार्यकर्ते योगेश काकडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "शिवरायांनी अठरापगड जातींच्या लोकांना एकत्र आणून स्वराज्य उभे केले. त्यांचा हाच एकतेचा संदेश आजच्या तरुणांनी अंगीकारण्याची गरज आहे."

तर दैनिक युवक आधारचे प्रतिनिधी तुकाराम नाटकर यांनी मोरेगावच्या एकतेचे कौतुक करत, "गावातील अशा उपक्रमांमुळे नवीन पिढीला आपल्या वैभवशाली इतिहासाची प्रेरणा मिळते," असे विचार व्यक्त केले.

***मान्यवरांची उपस्थिती***

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय अधिकारी लाटे सर, गावचे पोलीस पाटील तुळशीदास मगर, ग्रामपंचायत सदस्य सखाराम नाटकर प्रामुख्याने उपस्थित होते.

***ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद***

शिवराज्यभिषेक सोहळ्याला गंगाधरराव नाटकर, दिनकर चट्टे, गजानन पौळ, गोविंद चट्टे, गोविंद शेळके, गजानन चट्टे, विनोद मगर,आकाश खंडागळे,बालासाहेब मगर, महादेव मगर, खंडू मोरे, मुरलीधर नाटकर, वीर गुरुजी, दिलीप हरदास, अनिल ढाले, आदित्य पौळ, सचिन मगर यांच्यासह मोरेगावचे आबालवृद्ध आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुणांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/आकोट प्रतिनिधी :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गजानन नगर अकोट येथे झेप ट्युशन क्लासेस स्काऊट गाईड्सच्या जिजाऊ युनिटच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमास दिलीप मिसळे, नगरसेवक तथा आरोग्य सभापती मनीष कराळे, रघुनाथ मिसळे, विजय लिल्हारे,जयंत गांगलवार तसेच नागापूरे काकू यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



यावेळी झेप ट्युशन क्लासेसमधील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणासाठी श्रमदान करून पर्यावरणाबाबतची आपली जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. तसेच गणेश कुलट, धनराज गावंडे आणि झेप कोचिंग क्लासचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.गाईड कॅप्टन शुभांगी गांगलवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि झेप ट्युशन क्लासेस स्काऊट गाईड्सच्या जिजाऊ युनिट, अकोट यांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे सुंदर व नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले.


पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करून अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना सदैव पाठिंबा देण्याची ग्वाही दिली.

# पेपर वाटपाची सायकल अन् 'अग्निवीर'चे स्वप्न; पालोदच्या पवनची जिद्द ठरली 'रोल मॉडेल'

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील २० वर्षीय पवन ज्ञानेश्वर पालोदकर याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत, भारतीय सैन्यदलात 'अग्निवीर' म्हणून निवड मिळवली आहे. पहाटे पेपर वाटपाची सायकल चालवण्यापासून सुरू झालेला त्याचा हा संघर्षपूर्ण प्रवास आज अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.३१ मे रोजी भारतीय सैन्यदलाच्या भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल जाहीर झाला. पवनच्या निवडीचे वृत्त समजताच पालोद गावात जल्लोष साजरा करण्यात आला. ग्रामस्थांनी फटाके फोडून व डीजेच्या तालावर त्याची भव्य मिरवणूक काढली. या यशाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी गावातील मान्यवर आणि ग्रामस्थांनी पवनचा विशेष गौरव करून त्याचे अभिनंदन केले.पवनने गेल्या काही वर्षांपासून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दररोज पहाटे पाच वाजता वृत्तपत्र वाटपाचे काम स्वीकारले होते. पेपर वाटपाच्या निमित्ताने होणारा शारीरिक व्यायाम आणि त्यानंतरचा अभ्यासाचा सराव, असा दिनक्रम त्याने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पाळला. कुठल्याही महागड्या कोचिंग क्लासची मदत न घेता, केवळ स्वबळावर आणि सातत्यपूर्ण सरावाने त्याने सैन्यदलातील भरती प्रक्रियेचे सर्व कठीण टप्पे यशस्वीरीत्या पार केले आहेत.



**"शिस्त आणि कष्टच यशाची गुरुकिल्ली"**

**यशाचा प्रवास उलगडताना पवन म्हणाला, "पहाटे वृत्तपत्र वाटल्यामुळे मला वेळेची आणि श्रमाची शिस्त लागली. पेपर वाटपाच्या त्या सायकलनेच मला सैन्यातील कठोर शिस्तीसाठी तयार केले. माझ्या यशात आई-वडिलांचा मोलाचा वाटा आहे. मी केवळ एक माध्यम आहे, पण माझ्या गावातील प्रत्येक युवकाने हे लक्षात ठेवावे की, परिस्थिती कितीही बिकट असली तरी योग्य ध्येय आणि सातत्यपूर्ण मेहनतीपुढे कोणतीही अडचण मोठी नसते."**

**— पवन पालोदकर, नवनियुक्त 'अग्निवीर'**

# चिंता सोडा, शाळा जोडा; दिव्यांग मुलांचे भविष्य घडवा – गटशिक्षणाधिकारी विलास साळी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पालकांची लगबग सुरू झाली आहे. मात्र, घरात दिव्यांग मूल असलेल्या अनेक पालकांच्या मनात शिक्षणाबाबत विविध प्रश्न आणि चिंता निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अशा पालकांसाठी समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणारा समावेशित शिक्षण उपक्रम आशेचा किरण ठरत आहे.दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हा परिषद मराठी शाळांमध्ये मोफत प्रवेशासह विविध शैक्षणिक आणि पूरक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी यांनी दिली.समग्र शिक्षा अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक आणि सामाजिक गरजांचा विचार करून विशेष शिक्षकांचे मार्गदर्शन, आवश्यकतेनुसार थेरपी सेवा, शैक्षणिक साहित्य, विविध सहाय्यभूत साधने, वाहतूक भत्ता, मदतनीस भत्ता तसेच पोषण आहाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच विद्यार्थ्यांना पूर्णतः मोफत आणि दर्जेदार शिक्षण देण्यावर भर दिला जाणार आहे. समावेशित शिक्षणाच्या माध्यमातून दिव्यांग आणि सामान्य विद्यार्थी एकत्र शिकतात, वाढतात आणि एकमेकांना समजून घेतात. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, तर समाजामध्ये स्वीकार, सहकार्य आणि संवेदनशीलतेची भावना अधिक दृढ होते. शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समतेचा संदेशही



या उपक्रमातून दिला जात आहे.याबाबत पालकांना आवाहन करताना गटशिक्षणाधिकारी विलास साळी म्हणाले, "कोणतेही मूल केवळ अपंगत्वामुळे शिक्षणापासून वंचित राहू नये. प्रत्येक बालकामध्ये काही ना काही विशेष क्षमता असते. त्या क्षमतेला योग्य दिशा, संधी आणि आधार मिळणे आवश्यक आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात एकही दिव्यांग मूल घरात राहणार नाही आणि प्रत्येक मूल शाळेची पायरी चढेल, हा आपला सामूहिक संकल्प असला पाहिजे."दरम्यान, पंचायत समिती निफाडच्या शिक्षण विभागाने नागरिकांनाही या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. आपल्या परिसरात, गावात किंवा शेजारी मतिमंद, अस्थिव्यंग, कर्णबधिर, अंध, मूकबधिर अथवा इतर कोणत्याही प्रकारचे दिव्यांग मूल आढळल्यास त्यांची माहिती जवळील जिल्हा परिषद मराठी शाळा किंवा शिक्षण विभागाकडे देण्याचे आवाहन करण्यात आले आहे."दिव्यांगत्व ही मर्यादा नसून योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास प्रत्येक बालक यशाची नवी उंची गाठू शकते. शिक्षणाचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि एकही दिव्यांग मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी समाजातील सर्व घटकांनी हातात हात घालून पुढे येण्याची गरज आहे," असे आवाहनही शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.समग्र शिक्षा अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे निफाड तालुक्यातील अधिकाधिक दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळून त्यांचे शैक्षणिक आणि सामाजिक सक्षमीकरण होण्यास मोठी मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.



# पावसाळ्यात स्ट्रीट फूड खाण्यापूर्वी या गोष्टी जरूर जाणून घ्या..

पहिल्या पावसाच्या सरी कोसळल्या की गरमागरम भजी, वडा पाव, पाणीपुरी, भेळ आणि मक्याचा सुगंध अनेकांना रस्त्याकडे खेचतो. पावसाळा आणि स्ट्रीट फूड यांचं नातं जणू काही अतूटच आहे. मात्र जिभेचे चोचले पुरवताना आरोग्याचा विचार करणे तितकेच महत्त्वाचे ठरते. कारण याच ऋतूमध्ये अन्न दूषित होण्याचा आणि पोटाच्या संसर्गाचा धोका सर्वाधिक असतो.

रस्त्यावरील चटकदार पदार्थांचा मोह आवरणे कठीण असले तरी काही साध्या गोष्टींची काळजी घेतल्यास तुम्ही पावसाळ्यातही सुरक्षितपणे खाद्यपदार्थांचा आनंद घेऊ शकता.

**गरमागरम पदार्थ**

पावसाळ्यात ताजे आणि गरम अन्न खाणे सर्वात सुरक्षित मानले जाते. भजी, वडा पाव किंवा भाजलेला मका यांसारखे पदार्थ ताजे बनवले जात असतील तर त्यातून संसर्गाचा धोका तुलनेने कमी असतो.

**पाणीपुरी, कच्च्या पदार्थांपासून सावध**

पाणीपुरी, कापलेली फळे किंवा आधीच तयार ठेवलेले सलाड यामध्ये वापरले जाणारे पाणी आणि स्वच्छता याबाबत खात्री नसते. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन करताना विशेष काळजी घ्यावी.

**स्वच्छतेकडे लक्ष द्या**

स्टॉलवरील भांडी, विक्रेत्याचे हात, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि परिसराची स्वच्छता पाहूनच पदार्थ खरेदी करा आणि मगच खा. स्वच्छता हीच पावसाळ्यातील सुरक्षित खाण्याची पहिली अट आहे.

**तेलकट पदार्थ**

सतत तळलेले आणि तेलकट पदार्थ खाल्ल्याने अपचन, ॲसिडिटी आणि पोटदुखीचा त्रास वाढू शकतो. त्यामुळे प्रमाणातच स्ट्रीट फूडचा आनंद घ्या.

**पॅकबंद आणि स्वच्छ पाणी**

खाद्यपदार्थांसोबत नेहमी पॅकबंद किंवा सुरक्षित पाणी प्या. दूषित पाण्यामुळे पोटाचे आजार होण्याची शक्यता वाढते. त्याचबरोबर, पावसाळ्यात बऱ्याचदा घरीसुद्धा पाणी दूषित येण्याची समस्या जाणवते त्यामुळे दररोज पाणी गाळून व उकळूनच प्या.